पवित्र श्रावण मासारंभानिमित्त मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २०६ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | मंगळवार २५/०८/२०२६ । पाने - ६

सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा महोत्सव सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३१९५५.

## तुकाराम मुंढेंच्या आदेशाविरोधात
### खाद्यतेल व्यापारी न्यायालयात जाणार



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे सध्या राज्यात चर्चेत आहेत. ते करत असलेल्या धडाकेबाज कारवाईने अनेकांची मने जिंकली आहेत. त्यांच्या कारवाईची दहशत अनेक ठिकाणी पाहायला मिळाली. पण तुकाराम मुंढे यांनी नाशिकमध्ये केलेल्या कारवाईची सध्या राज्यात जोरदार चर्चा सुरु आहे. कारण या कारवाईच्या विरोधात अनेक व्यापारी एकवटले आहेत. तसेच त्यांनी आवाज देखील उठवला आहे.नाशिकमध्ये खाद्यतेल व्यापाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक झाली. तुकाराम मुंडे यांच्या सुट्टे खाद्यतेल विक्रीबंदीच्या निर्णयाविरोधात व्यापाऱ्यांनी एकजुटीने आवाज उठवला. बैठकीत व्यापाऱ्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, हा निर्णय लहान व्यावसायिकांना आर्थिक संकटात ढकलणारा आहे. व्यापाऱ्यांनी ठरवले आहे की, तुकाराम मुंडे यांच्या निर्णयाला ते न्यायालयात आव्हान देतील.

त्याचबरोबर राज्य सरकारला १५ दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. या कालावधीत निर्णय मागे न घेतल्यास राज्यातील सर्व खाद्यतेल व्यापारी रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असा इशाराही देण्यात आला. केवळ राज्य सरकारपुरते मर्यादित न राहता केंद्र सरकारकडेही पाठपुरावा करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.बैठकीत व्यापाऱ्यांनी दंड आणि कारावासाच्या तरतुदीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. १० लाख रुपये दंड आणि कारावासाची तरतूद पूर्णपणे अन्यायकारक आहे. आम्ही अतिरेकी आहोत का? असा संतप्त सवाल व्यापाऱ्यांनी उपस्थित केला. त्यांच्या मते, सुट्टे तेल विक्री हा अनेक वर्षांपासून चालत आलेला व्यवसाय असून, अचानक बंदी घातल्याने हजारो कुटुंबे आर्थिक संकटात सापडणार आहेत.

नाशिकमध्ये झालेल्या या बैठकीत राज्यातील विविध जिल्ह्यांतील व्यापारी संघटनांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला. व्यापाऱ्यांनी सांगितले की, ग्राहकांनाही सुट्टे तेल स्वस्त दरात उपलब्ध होते. बंदीमुळे पॅक्ड ऑइलची किंमत वाढेल आणि सामान्य ग्राहकांवर अतिरिक्त भार पडेल. त्यामुळे सरकारने व्यापारी आणि ग्राहक दोघांच्या हिताचा विचार करून निर्णय मागे घ्यावा..

## कर्माकडून कृतार्थतेकडे
### संगमनेरात 'ज्ञानेश्वरी भाव यात्रा'



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरीतील विचारांचा भावार्थ आणि जीवनदृष्टी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने संगमनेरात 'कर्माकडून कृतार्थतेकडे - ज्ञानेश्वरी भाव यात्रा' या विशेष व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्ञानेश्वरीच्या अध्याय ३ व ४ वर आधारित या व्याख्यानातून कर्मयोग, कर्तव्य आणि आध्यात्मिक जीवनाचा सुंदर मेळ उलगडला जाणार आहे. या व्याख्यानमालेत गीता परिवाराचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी हे प्रेरक व्याख्यान देणार आहेत. सोमवार दि. २४ ऑगस्ट आणि मंगळवार दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ७ ते ८.३० या वेळेत मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर येथे हा कार्यक्रम होणार आहे. ज्ञानेश्वरीतील गहन तत्त्वज्ञान सहज, सोप्या आणि जीवनाला स्पर्श करणाऱ्या भाषेत समजून घेण्याची संधी या माध्यमातून संगमनेरकरांना मिळणार आहे. विशेषतः कर्माकडे केवळ कर्तव्य म्हणून न पाहता त्यातून जीवनाची कृतार्थता कशी साधता येते, यावर डॉ. मालपाणी मार्गदर्शन करणार आहेत.

राजस्थान युवक मंडळाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संगमनेरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ज्ञानेश्वरीच्या विचारांचा अनुभव घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. गीता, ज्ञानेश्वरी आणि भारतीय अध्यात्मातील जीवनमूल्ये यांचा अभ्यास करणाऱ्या तसेच अध्यात्मिक विचारांची आवड असलेल्या नागरिकांसाठी ही भाव यात्रा विशेष पर्वणी ठरणार आहे.

## कोचिंग क्लासेसवर निर्बंध
## मुलांवरचा ताण कमी होणार

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील खासगी कोचिंग क्लासेसच्या मनमानी कारभाराला चाप लावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांवरील शैक्षणिक ताण कमी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक मोठा आणि महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. राज्य शासनाने प्रस्तावित केलेल्या नवीन कायद्यानुसार आता खासगी कोचिंग क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांचे वर्ग दिवसातून ५ तासांपेक्षा जास्त घेता येणार नाहीत. इतकेच नव्हे तर १३ वर्षांखालील बालकांना कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश देण्यावर पूर्णपणे बंदी घालण्याची शिफारस या मसुद्यात करण्यात आली आहे. स्पर्धा परीक्षा आणि नीट सारख्या परीक्षांच्या नावाखाली चालणारा कोचिंग क्लासेसचा बाजार, अवाजवी फी, विद्यार्थ्यांचे होणारे मानसिक खच्चीकरण आणि गैरप्रकार रोखण्यासाठी सरकारने हा कठोर मसुदा तयार केला आहे. या नवीन नियमांनुसार, २५ पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या प्रत्येक क्लासला नोंदणी करणे बंधनकारक असणार आहे. तसेच रँक किंवा गुणांची खोटी आश्वासने देणे, गुणवत्तेनुसार मुलांचे वेगळे बॅच पाडणे, आणि खूप सकाळी किंवा रात्री उशिरा क्लास घेणे यावरही बंदी घालण्यात येणार आहे.

या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या क्लासेसवर थेट ५० लाखांपर्यंतचा दंड किंवा नोंदणी रद्द करण्याची कारवाई प्रस्तावित आहे. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे 'महाराष्ट्र खाजगी कोचिंग केंद्रे (नोंदणी आणि नियमन) अधिनियम, २०२६' या नवीन कायद्याचा मसुदा प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या प्रस्तावित कायद्यानुसार, राज्यातील कोचिंग क्लासेसवर कठोर बंधने आणली जाणार आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर थेट ५० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे.विद्यार्थ्यांचा शैक्षणिक ताण कमी करण्यासाठी कोचिंग क्लासेसचा कालावधी दिवसातून जास्तीत जास्त ५ तास असेल.



## दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर कारवाई




मुंबई (वृत्तसंस्था)

खाद्यपदार्थांबाबत जाहिरातींमधून ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या कंपन्यांवर भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने कारवाईचा बडगा उगारला आहे. चुकीचे दावे करणे, तसेच उत्पादनांच्या लेबलवर आवश्यक माहिती न देणे अशा प्रकरणांत गेल्या काही महिन्यांत १५० हून अधिक नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने स्पष्ट केले की, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, खोटे दावे आणि लेबलिंगच्या नियमांचे पालन न केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने सोशल मीडियावर कारवाई करण्यात आलेल्या काही मोठ्या कंपन्यांची नावेही जाहीर केली आहेत. यामध्ये नेस्ले इंडिया, पेप्सिको, कोका-कोला इंडिया, ॲबॉट इंडिया, रेड बुल इंडिया, डॅनोन इंडिया आणि मॉन्स्टर एनर्जी इंडिया यांचा समावेश आहे. याशिवाय हेल एनर्जी, मॉन्डेलेझ इंडिया, डियाजिओ, पर्नोड रिकार्ड, फेरेरो इंडिया आणि केनव्ह्यू या कंपन्यांवरही कारवाई करण्यात आली आहे.

अन्न सुरक्षा कायदे आणि नियमांचे गंभीर उल्लंघन आढळल्यामुळे विविध कंपन्या आणि खाद्य व्यवसायांवर ही कारवाई करण्यात आल्याचे भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने सांगितले.

## सौरप्रकल्पाला ब्रेक; कौठे मलकापूर औद्योगिक वसाहतीचा मार्ग मोकळा
### आ. खताळ यांच्या मागणीला मुख्यमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्याच्या पठारभागातील कौठे मलकापूर येथे प्रस्तावित औद्योगिक वसाहतीसाठी सरकारी गट क्रमांक १६२ मधील १०.८३ हेक्टर शासकीय जमीन हस्तांतरित करण्याच्या आमदार अमोल खताळ यांच्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. सदर शासकीय जमिनीवर मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत प्रस्तावित सौरऊर्जा प्रकल्पाला स्थगिती देण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना दिले आहेत. त्यामुळे कौठे मलकापूर येथील औद्योगिक वसाहतीच्या



> संगमनेरच्या औद्योगिक विकासाला प्राधान्य देत स्थानिकांच्या हिताचा निर्णय व्हावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. सौरऊर्जा प्रकल्पा ऐवजी औद्योगिक वसाहतीसाठी जमीन उपलब्ध होणे ही संगमनेरच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे. या निर्णयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त करतो.
>
> **आ. अमोल खताळ, संगमनेर**

उभारणीसाठीचा मार्ग सुकर झाला असून, पठारभागातील हजारो युवकांच्या रोजगाराच्या अपेक्षांना नव्याने बळ मिळाले आहे.

कौठे मलकापूर परिसरात एकूण २२७.५३ हेक्टर क्षेत्रावर औद्योगिक वसाहत प्रस्तावित आहे. यामध्ये सरकारी गट क्रमांक १६२ मधील १०.८३ हेक्टर शासकीय जमिनीचा समावेश आहे. मात्र ही जमीन मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत सौरऊर्जा प्रकल्पासाठी देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली होती. औद्योगिक वसाहतीसाठी क्षेत्र प्रस्तावित असताना ही जमीन सौरऊर्जा प्रकल्पासाठी देण्याच्या निर्णयास स्थानिक ग्रामस्थांनी विरोध दर्शविला होता. कौठे मलकापूर ग्रामसभेनेही सौरऊर्जा प्रकल्पास नामंजुरी दर्शविली होती. तसेच सदर शासकीय जमीन औद्योगिक क्षेत्रासाठी प्रस्तावित असल्याने ती सौरऊर्जा प्रकल्पासाठी देणे योग्य ठरणार नसल्याचे तहसीलदारांनीही स्पष्ट केले होते. स्थानिक ग्रामस्थांना पूर्वकल्पना न देता सौरऊर्जा प्रकल्प सुरू करण्याची कार्यवाही होत

(पान २ वर)

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132


सोन्यांच्या दागिन्यांची मजुरी फक्त 7%
मुदत फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
PBM Jeweller's
श्रावण मास आणि रक्षाबंधन निमित्त
चांदी खरेदीवर 30% DISCOUNT
ऑफर फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर चावडी जवळ, संगमनेर
7599996999 / 8265036807
Follow us on:

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# शिर्डीच्या पत्रकारितेत अखंड ऊर्जा - चिलवंत

शिर्डी

साईबाबांची शिर्डी हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तीर्थक्षेत्र आहे. येथे राष्ट्रपती, पंतप्रधान यांच्यापासून ते बॉलिवूडमधील तारकांपर्यंत सर्वजण येतात. येथे बातमीदारी करण्यात एक वेगळाच आनंद आणि ऊर्जा आहे. येथील माहिती अधिकारी कार्यालय त्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असे प्रतिपादन नूतन जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत यांनी केले.



येथील माहिती कार्यालयातील माहिती अधिकारी सुरेश पाटील यांची सहायक संचालकपदी नियुक्ती झाली. त्यांच्या जागी डॉ. मीरा ढास यांची नियुक्ती करण्यात आली. पाटील यांना निरोप आणि डॉ. ढास यांच्या स्वागतानिमित्त आयोजित अनौपचारीक कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शिर्डी प्रेसक्लबचे अध्यक्ष प्रमोद आहेर, अधिस्वीकृती समिती सदस्य नवनाथ दिघे, दिलीप खरात, बाळासाहेब सोनावणे, माध्यम प्रतिनिधी मनोज गाडेकर, सचिन बनसोडे व कुणाल जमधडे आदी उपस्थित होते.

पाटील म्हणाले की, मागील पाच वर्षांत माहिती अधिकारी या नात्याने येथे कार्यरत असताना खूप काही शिकायला मिळाले. शिर्डीत देशाच्या विविध प्रातांच्या संस्कृतीचे दर्शन घडते. एका अर्थाने भारत देश डोळ्यांसमोर उभा राहतो. आपल्या कार्यकालात येथील माध्यम प्रतिनिधींचे सातत्याने सहकार्य मिळाले. आयुष्यभर जतन करावेत असे अनुभव साईंच्या दरबारात मिळाले. नूतन माहिती अधिकारी डॉ. ढास म्हणाल्या की, पत्रकारितेचे स्वरूप वेगाने बदलत आहे. सोशल मीडिया आणि नवे तंत्रज्ञान यामुळे पुढे काय होईल, याबाबत सातत्याने चर्चा सुरू आहे. मात्र प्रत्यक्ष मैदानावरचे बातमीदार आणि आशयघन मजकूर देण्याची क्षमता असलेल्या माध्यम प्रतिनिधी यांचे स्थान या बदलात कायम राहील. अधिस्वीकृती समितीचे सदस्य नवनाथ दिघे यांनी स्वागत केले. पत्रकार प्रमोद आहेर यांनी आभार मानले.यावेळी उपस्थित पत्रकारांनी सुरेश पाटील यांच्या कार्यकाळातील योगदानाचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ८.७ कोटी तरुण शिक्षण-रोजगारापासून वंचित

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अंदाजे ८.७ कोटी भारतीय तरुण (वय १५ ते २९) शिक्षण घेत नाही, रोजगार नाही, प्रशिक्षणही घेत नाही, ही आकडेवारी अनुदानित प्रशिक्षण कार्यक्रमांची तातडीची गरज अधोरेखित करते. या कार्यक्रमाचा उद्देश स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणे आणि स्थानिक मागणी व उदयोन्मुख क्षेत्रांनुसार कौशल्ये प्रदान करणे हा आहे, असा धक्कादायक खुलासा नीती आयोगाच्या एका ताज्या अहवालात झाला आहे.

आयोगाने विकसित भारतासाठी कौशल्य विकासाची पुनर्कल्पना २०४७((नीट-नॉट इन एजुकेशन, एम्प्लायमेंट आणि ट्रेनिंग २०२७) नावाच्या आपल्या अहवालात हा अंदाज सादर केला आहे. ही आकडेवारी २०२१ मध्ये आयोजित राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या ७८ व्या फेरीतील माहितीवर आधारित आहे. आयोगाने भारतातील मनुष्यबळ आणि शिकाऊंची पाच श्रेणींमध्ये विभागणी केली आहे. यात शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, औपचारिक आणि अनौपचारिक काम, तसेच शिक्षण, रोजगार आणि प्रशिक्षण (नीट) यांपासून दूर असलेले तरुण आणि महिला यांचा समावेश आहे. नीती

आयोगाच्या व्याख्येनुसार, शिक्षण, रोजगार किंवा प्रशिक्षणात गुंतलेले नसलेले १५ ते २९ वयोगटातील व्यक्ती म्हणजे नीट तरुण. यामध्ये बेरोजगार तरुणांचाही समावेश आहे. उत्पन्नाचा अभाव आणि मागील शिक्षणात गुंतविलेल्या खर्चामुळे तरुण अड़चणीत येतात. त्यांना परवडणाऱ्या किंवा अनुदानित प्रशिक्षण पर्यायांची आवश्यकता आहे. जिथे या अडचणी सर्वाधिक तीव्र आहेत, तिथे त्यांना विशेष आर्थिक मदतीचीही गरज आहे. अहवालानुसार, केवळ ८.२५% पदवीधर त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार असलेल्या कामात गुंतलेले आहेत. उद्योगाच्या गरजेनुसार तयार केलेल्या व्यावहारिक शिक्षण आणि प्रशिक्षणाचा अभाव पदवीधारक तरुणांच्या सेजगारक्षमतेवरही परिणाम करत आहे.

आयोगाने तरुण आणि महिलांसाठी त्यांच्या गरजेनुसार आर्थिक मदतीसह परवडणारे किंवा अनुदानित प्रशिक्षण देण्याची शिफारस केली आहे. कामगार आणि तरुणांसाठी पुनौशल्य, स्वयंरोजगार आणि स्थानिक गरजा व उदयोन्मुख क्षेत्रांशी संबंधित प्रशिक्षणावर भर देण्यात आला आहे.

# नागपुरात मध्यरात्री गॅस गळतीने हा:हा:कार - ४० जण रुग्णालयात



नागपूर (वृत्तसंस्था)

नागपूरमधील गोधणी परिसरात रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास क्लोरिन वायूची भीषण गळती झाल्याने प्रचंड खळबळ उडाली आहे. गोधणी नगरपंचायतीच्या जलशुद्धीकरण प्रकल्पात (वाटर ट्रिटमेंट प्लांट) अचानक क्लोरिन गॅस लीक झाल्याने परिसरातील नागरिकांना आणि कर्मचाऱ्यांना तीव्र श्वासोच्छवासाचा त्रास सुरू झाला. या घटनेत प्रकल्पामधील ८ ते १० कर्मचाऱ्यांसह परिसरातील २० ते २५ नागरिक, अशा तब्बल ४० जणांची प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मध्यरात्री अंदाजे १२:१५ वाजताच्या सुमारास जलशुद्धीकरण केंद्रात ही गॅस गळती सुरू झाली. हवेत गॅस पसरल्याने लोकांना अचानक दम लागणे, डोळ्यांची जळजळ होणे आणि खोकल्याचा त्रास सुरू झाला. बाधित ४० जणांपैकी ४ ते ५ नागरिकांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात हलवण्यात आले असून इतरांवर सामान्य कक्षात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच नागपूर पोलीस, अग्निशमन दल आणि NDRF च्या पथकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. रात्रीपासूनच पोलिसांनी परिसरात रेस्क्यू ऑपरेशन राबवून बाधित नागरिकांना रुग्णालयात पोहोचवले, तर इतरांना सुरक्षित स्थळी हलवले. गॅस गळती रोखण्याचे आणि ती पूर्णपणे निष्प्रभ करण्याचे काम अजूनही युद्धपातळीवर सुरू आहे.

# जेके टायर्स शोरूमचे दिमाखात उद्‌घाटन

संगमनेर (प्रतिनिधी)

चाकण- येथे आफताब इनामदार यांच्या जेके टायर्स एजन्सीच्या भव्य शोरूमचा उद्घाटन सोहळा नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. जेके टायर्सचे झोनल हेड मिस्टर रवी सिंग तसेच रिजनल मॅनेजर जितेंद्र कुमार सिंग यांच्या हस्ते शोरूमचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला संगमनेरचे अब्दुल्ला हसन चौधरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी अब्दुला चौधरी यांनी उपस्थितांची मने जिंकली. विशेष म्हणजे, आपल्या भाषणाला शेर-शायरीची जोड देत त्यांनी कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

नया जमाना है, नये जमाने की बात करो; सब टायर कंपन्या पुरानी हो चुकी हैं, जेके टायर की बात करो, अशा आशयाच्या उत्स्फूर्त शेरो-शायरीच्या माध्यमातून चौधरी यांनी जेके टायर्सचे वैशिष्ट्य अधोरेखित केले. त्यांच्या या अनोख्या शैलीमुळे उद्घाटन सोहळ्याची रंगत आणखी वाढली आणि उपस्थित चाकणकरांनी उत्स्फूर्त दाद दिली. चौधरी यांच्या शेरो-शायरीचे जेके टायर्सचे झोनल हेड रवी सिंग आणि रिजनल मॅनेजर जितेंद्र कुमार सिंग यांनीही कौतुक केले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. यावेळी आफताब इनामदार यांचे वडील नजीरभाई इनामदार, बंधू मंजूर इनामदार, अब्रार इनामदार, अरहम इनामदार , रियाज, बन्सीभाई, तसेच बँक ऑफ इंडिया पुणेचे मॅनेजर शेख शफीभाई, शेख हसीब यांच्यासह चाकण शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# अमरावतीच्या रुग्णालयात आग तीन नवजात बालकांचा मृत्यू

अमरावती (वृत्तसंस्था)

अमरावतीमध्ये आज पहाटे एक अत्यंत धक्कादायक घटना घडली. जिल्हा स्त्री रुग्णालयात नवजात शिशु कक्षाला आग लागली. या आगीत तीन लहान बालकांचा होळपळून मृत्यू झाला. पहाटे ३.३० वाजता नवजात शिशु अतिदक्षता विभागात अचानक आग लागली. व्हेंटिलेटरमध्ये स्फोट झाल्याने ही आग लागली. जिल्हा स्त्री रुग्णालयातील तिसऱ्या माळ्यावर असलेल्या नवजात शिशु अतिदक्षता कक्षाला पहाटे ३.३० वाजता अचानक व्हेंटिलेटरमध्ये स्फोट झाल्याने आग लागली. ९ लहान बाळांना याठिकाणी ठेवले होते. या नवजात शिशु अतिदक्षता विभागात मध्ये एकूण नऊ बालकांवर उपचार सुरु होते. यात तीन बालकांचा मृत्यू झाला. सहा बालकांना सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या दुर्घटनेत आई-वडिलांनी आपल्या कोवळ्या बाळांना गमावलं आहे. निशब्द, मन सुन्न करणारी ही घटना आहे.

रुग्णालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. सर्वसामान्यांच्या मनात या घटनेबद्दल चीड, संतापाची भावना आहे.ज्या बालकांचं वजन कमी असतं, ज्या मातांची सातव्या महिन्यात प्रसुती होते, ज्या बालकांना जन्मल्यानंतर वाढीमध्ये काही समस्या असतात किंवा डॉक्टरांना ज्या बालकांना विशेष देखरेखीखाली ठेवायचं असतं, अशा बाळांना नवजात शिशु अतिदक्षता विभागात NICU मध्ये ठेवलं जातं. मध्यरात्री ३.३० च्या सुमारास व्हेंटिलेटरचा स्फोट होऊन आग भडकली. सगळा NICU कक्ष या आगीत जळून खाक झाला आहे. दृश्यांमधून या आगीची तीव्रता किती भयंकर होती, ते दिसून येतय. आगीमुळे बाळांचा गुदमरुन मृत्यू झाला.ज्या व्हेंटिलेटरचा स्फोट झाला, ते कालबाह्य झाले होते का? त्यात काही तांत्रिक समस्या होत्या का? असे अनेक प्रश्न आहेत. ज्या परिसरात हे हॉस्पिटल आहे, तिथपासून फायरब्रिगेडचं ऑफिस किती लांब आहे? आग लागल्यानंतर अग्निशमन दलाचे बंब किती वेळात पोहोचले? हे सर्व प्रश्न उपस्थित होत आहेत.

# शिव होऊनच शिवाची पूजा करावी !




संगमनेर - श्रावण महिन्यातील दुसरा सोमवार म्हणजे शिवभक्तांसाठी श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक आनंदाचा पर्वणीचा दिवस. या दिवशी संगमनेर शहर व परिसरातील सर्व शिवमंदिरे भक्तिभावाने खुलून जातात. पहाटेपासूनच मंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असून, दिवसभर भगवान शंकराच्या नामस्मरणाने आणि अभिषेकाने वातावरण भक्तिमय होते.

संध्याकाळच्या वेळी विविध मंदिरांमध्ये नवनाथ पोथीचे पारायण, शिवपुराण, शिवलीलामृत तसेच शिवमहिम्नस्तोत्राचे वाचन केले जाते. त्यामुळे संपूर्ण परिसरात अत्यंत धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण होते. संगमनेर परिसरातील खंडेश्वराच्या दर्शनासाठीही अनेक शिवभक्त पायी जातात. श्रद्धा आणि भक्तीचा हा अनुभव मनाला विलक्षण समाधान देणारा असतो.

भगवान शंकर हे केवळ देवता नसून प्रेम, ज्ञान, करुणा आणि कल्याणाचे प्रतीक आहेत. समुद्रमंथनातून निघालेले विष जगाच्या कल्याणासाठी भगवान शंकरांनी हसतमुखाने प्राशन केले. म्हणूनच नीलकंठ असलेल्या त्या कल्याणकारी महादेवांना वारंवार नमस्कार करावा, अशी भावना शिवभक्तांच्या मनात असते.

शिवलिंगाची अगाध महती

भगवान विष्णू आणि ब्रह्मदेव यांच्यात एकदा आपल्यामध्ये श्रेष्ठ कोण, यावरून वाद निर्माण झाला. त्यावेळी भगवान शिव एका अनंत लिंगस्तंभाच्या रूपात प्रकट झाले. त्यांनी विष्णू आणि ब्रह्मदेवांना या लिंगाचा आरंभ आणि शेवट शोधण्यास सांगितले.

भगवान विष्णू लिंगाचे मूळ शोधण्यासाठी खाली गेले, तर ब्रह्मदेव त्याची उंची शोधण्यासाठी वर गेले. बराच प्रयत्न करूनही विष्णूंना लिंगाचे मूळ सापडले नाही. त्यांनी सत्य स्वीकारून आपल्याला मूळ सापडले नसल्याचे मान्य केले. मात्र ब्रह्मदेवालाही लिंगाचा अंत सापडला नाही. त्या वेळी वरून केवड्याचे फूल खाली येताना दिसले. ब्रह्मदेवांनी केवड्याच्या फुलाला खोटे साक्षीदार होण्यास सांगितले आणि आपण लिंगाचा अंत शोधल्याचे सांगितले.

ब्रह्मदेवाच्या या असत्यामुळे भगवान शिव क्रोधित झाले. त्यांनी ब्रह्मदेवाला खोटे बोलल्याबद्दल शिक्षा दिली आणि केवड्याच्या फुलालाही आपल्या पूजेत स्थान मिळणार नाही, असा शाप दिला. त्यामुळेच भगवान शिवाच्या पूजेत केवड्याचे फूल अर्पण केले जात नाही, अशी धार्मिक मान्यता आहे.

या अनंत शिवलिंगातून असंख्य अग्निज्वाळा प्रकट झाल्या. त्या लिंगस्तंभावर ओंकाराचे चिन्ह होते. सर्व देवतांनी त्या लिंगाचे प्रणवस्वरूपात स्वागत केले. शिवाचे स्वरूप किती अनंत आणि अगाध आहे, याचे हे प्रतीक मानले जाते.

एका बिल्वपत्राचे महत्त्व

भगवान शिवाला भक्तिभावाने अर्पण केलेले एक बिल्वपत्रही अत्यंत प्रिय मानले जाते.

**त्रिदलं त्रिगुणाकारं**
**त्रिनेत्रं च त्रियायुधम्।**
**त्रिजन्मपापसंहारं**
**एकबिल्वं शिवर्पणम्।।**

या श्लोकातून बिल्वपत्राचे महत्त्व स्पष्ट होते. तीन दलांचे बिल्वपत्र हे त्रिगुण, त्रिनेत्र आणि शिवाच्या त्रिशूलाचे प्रतीक मानले जाते. श्रद्धेने अर्पण केलेले एक बिल्वपत्रही भगवान शिवाला प्रिय आहे, अशी भक्तांची भावना आहे.

शिवाने अधर्म आणि अहंकाराचा विनाश केला. शिवाचे अस्तित्व नाकारणाऱ्या प्रजापतीच्या यज्ञाचा विध्वंस असो किंवा रावणाच्या दर्पाचा नाश असो, भगवान शिव हे अहंकाराचा विनाश करणारे आणि धर्माचे रक्षण करणारे देव म्हणून पूजले जातात. म्हणूनच रावणदर्पविनाशक लिंगम् असेही शिवलिंगाचे वर्णन केले जाते.

कर्पूरगौरं... हा शिवस्तुतीचा मंत्र

आपण अनेकदा आरतीनंतर कर्पूरगौरं करुणावतारं... हा श्लोक म्हणतो. मात्र हा केवळ आरतीनंतर म्हणायचा श्लोक नसून, तो भगवान शिवाची सुंदर स्तुती आहे.

**कर्पूरगौरं करुणावतारं**
**संसारसारं भुजगेन्द्रहारम्।**
**सदा वसन्तं हृदयारविन्दे**
**भवं भवानीसहितं नमामि।।**

या श्लोकाचा अर्थ अत्यंत सुंदर आहे. कापरासारखे गौरवर्ण असलेले, करुणेचे अवतार, संसाराचे सार असलेले आणि श्रेष्ठ नागांचा हार गळ्यात धारण करणारे भगवान शिव, माता भवानी म्हणजेच पार्वतीसह माझ्या हृदयात सदैव निवास करोत. अशा भगवान शिवांना माझा नमस्कार.

म्हणून हा श्लोक म्हणजे भगवान शिवाची स्तुती आणि त्यांच्याप्रती भक्तिभाव व्यक्त करणारा सुंदर मंत्र आहे.

शिवभक्तीतून सकारात्मक ऊर्जेचा अनुभव

श्रावणातील सोमवार हा केवळ उपवास आणि पूजेचा दिवस नसून आत्मचिंतन, संयम आणि भक्तीचा दिवस आहे. शिवपूजेमुळे मनाला शांतता मिळते, सकारात्मक विचारांची ऊर्जा निर्माण होते आणि सुख-समाधानाची अनुभूती मिळते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

शिव होऊनच शिवाची पूजा करायची म्हणजे आपल्या मनातील अहंकार, द्वेष आणि नकारात्मकता दूर करून प्रेम, करुणा, ज्ञान आणि कल्याणाची भावना मनात जागवणे. शिवतत्त्वाचा खरा अर्थही हाच आहे.

दुसऱ्या श्रावणी सोमवारी संगमनेर परिसरातील मंदिरांमध्ये घुमणारा हर हर महादेवचा जयघोष, बेलपत्रांचा सुगंध, अभिषेकाचे पवित्र जल आणि शिवनामाचा गजर यामुळे संपूर्ण वातावरण शिवमय झाले आहे. अशा या कल्याणकारी महादेवाच्या चरणी सर्वांच्या सुख, शांती, समाधान आणि कल्याणासाठी प्रार्थना करूया.

हर हर महादेव!

**प्रा. शशांक गंधे**
**संगमनेर, जि. अहिल्यानगर**
**मोबा.९८९०१६३६४२**

# प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सह्याद्री प्राथमिक विद्या मंदिरचे घवघवीत यश



चि.कार्तिक राहुल देशमुख गुण - २४८ | चि.रौनक अनिल सातपुते गुण - २३८ | कु.आरोही सागर श्रीमंदिलकर गुण - २२० | कु.गार्गी नितीन हासे गुण - २१६

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संचलित सह्याद्री प्राथमिक विद्या मंदिर, संगमनेर येथील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. विविध विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत शाळेची शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

या परीक्षेत कार्तिक राहुल देशमुख याने तब्बल २४८ गुण मिळवत विशेष प्राविण्य संपादन केले. रौनक अनिल सातपुते याने २३८, आरोही सागर श्रीमंदिलकर हिने २२०, तर गार्गी नितीन हासे हिने २१६ गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळविले. याशिवाय अर्णव अर्जुन तनपुरे (२१२), रिध्दी गोकुळ नारायणे (२०६), सम्यक संदिप भोजने (१९०), ईश्वरी दिलीप गायकवाड (१८४), आरोही रवि साबळे (१८२), काव्या रवि साबळे (१७८), मानसी शशिकांत जाधव (१७८), राजवर्धन विठ्ठल आहेर (१७०), स्वरा संजय साबळे (१७०), ऋत्विक पुष्पराज नेवासकर (१६८), शिवम प्रविण मापारी (१६८), अक्षया नारायण गुंजाळ (१६०), श्रेयस बाळासाहेब जाधव (१५८), सांची श्रीप्रसाद कदम (१५६), श्रेयस राजेश गायकवाड (१५४), आरव किरण लावरे (१४४), समिक्षा प्रकाश गायकवाड (१४४), प्रार्थ सचिन पुलाटे (१४०), ओवी संदिप वायळ (१२८), कौस्तुभ किरण आल्हाट (१२६), प्रिशा महेश शेणकर (१२६) आणि आरीव अनिल नेहे (१२४) यांनीही चांगली कामगिरी करत शाळेच्या नावलौकिकात भर घातली. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, अभ्यासातील शिस्त, योग्य नियोजन तसेच पालकांचे मोलाचे सहकार्य कारणीभूत ठरले. विद्यार्थ्यांना श्रीम. विजया आदमाने, श्रीम. मनिषा आहेर आणि श्रीम. अनिता पवार या मार्गदर्शक शिक्षिकांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाजाची शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालकवर्गाने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# पान १ वरून सौरप्रकल्पाला ब्रेक; कौठे मलकापूर ...

असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ग्रामस्थांनी त्यास तीव्र विरोध करत आंदोलनही केले होते.

दरम्यान, आमदार अमोल खताळ यांनी संगमनेर तालुक्याच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी पत्र दिले होते. कौठे मलकापूर येथील सरकारी गट क्रमांक १६२ मधील १०.८३ हेक्टर शासकीय जमीन सौरऊर्जा प्रकल्पासाठी न देता औद्योगिक वसाहतीसाठी हस्तांतरित करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली होती.

आमदार खताळ यांच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सदर सौरऊर्जा प्रकल्पाला स्थगिती देण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना दिले आहेत. त्यामुळे सौरऊर्जा प्रकल्पासाठी जमीन देण्याच्या कार्यवाहीला स्थगिती मिळाली असून पुढील कार्यवाही औद्योगिक वसाहतीच्या दृष्टीने करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

कौठे मलकापूर येथे औद्योगिक वसाहत विकसित झाल्यास परिसरात नवीन उद्योग व गुंतवणुकीला चालना मिळण्याबरोबरच मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# क्रीडापटू व नागरिकांमधील ‘ACL’ लिगामेंट दुखापतींवर संगमनेरमध्ये अत्याधुनिक उपचार

## मेडिकोव्हर हॉस्पिटलचे अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. रहांगडाले यांची माहिती






युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : खेळाडू तसेच दैनंदिन जीवनात झालेल्या दुखापतींमुळे गुडघ्याच्या सांध्याला होणाऱ्या ‘एसीएल’ (ACL - Anterior Cruciate Ligament) लिगामेंटच्या दुखापतींचे प्रमाण मोठे आहे. अशा दुखापतींवर आता संगमनेरमध्ये अत्याधुनिक पद्धतीने उपचार उपलब्ध झाले असून, मेडिकोव्हर हॉस्पिटलमध्ये दूरबीनद्वारे (आर्थ्रोस्कोपी) शस्त्रक्रिया केली जात असल्याची माहिती अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. निखिल रहांगडाले यांनी दिली.

एसीएल लिगामेंट हे गुडघ्याच्या स्थिरतेसाठी अत्यंत महत्त्वाचे असते. खेळताना अचानक वळणे, पडणे किंवा गुडघ्यावर आलेल्या मोठ्या आघातामुळे एसीएलला दुखापत होऊ शकते. काही रुग्णांमध्ये स्प्रेन किंवा आंशिक दुखापत असू शकते, तर गंभीर दुखापतीमध्ये लिगामेंट पूर्णपणे तुटू शकते.

पूर्णपणे तुटलेल्या लिगामेंटमुळे गुडघ्यात अस्थिरता, चालताना किंवा धावताना त्रास, वेदना तसेच भविष्यात गुडघ्याच्या सांध्यावर अतिरिक्त ताण निर्माण होऊ शकतो. त्यामुळे योग्य वेळी निदान व उपचार करणे आवश्यक आहे. मेडिकोव्हर हॉस्पिटलमध्ये आधुनिक आर्थ्रोस्कोपी तंत्रज्ञानाच्या मदतीने एसीएल लिगामेंटच्या दुखापतींवर उपचार केले जात आहेत. "Complete Tear' असलेल्या रुग्णांमध्ये आवश्यकतेनुसार एसीएल पुनर्रचना (ACL Reconstruction) शस्त्रक्रिया केली जाते. या प्रक्रियेमध्ये लहान छिद्रांद्वारे दूरबीनच्या साहाय्याने शस्त्रक्रिया करण्यात येते. शस्त्रक्रियेनंतर फिजिओथेरपीला विशेष महत्त्व असून, डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसार नियमित व्यायाम व पुनर्वसन केल्यास रुग्णाला गुडघ्याची हालचाल व स्थिरता पूर्ववत करण्यास मदत होते. योग्य उपचारानंतर अनेक रुग्ण पुन्हा त्यांच्या दैनंदिन कामकाजासह क्रीडा क्षेत्रातील हालचालींकडेही परतू शकतात.

याशिवाय चउड, झउड तसेच गुडघ्याच्या इतर लिगामेंट दुखापतींवरही आधुनिक उपचार उपलब्ध असल्याचे डॉ. निखिल रहांगडाले यांनी सांगितले.

गुडघ्याला दुखापत झाल्यानंतर सतत वेदना, सूज, गुडघा अस्थिर वाटणे किंवा चालताना त्रास होत असल्यास दुर्लक्ष न करता तज्ज्ञ अस्थिरोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

# राजहंसच्या वाहनातील डिझेल चोरी पकडली, चालक व वाहक ताब्यात




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संघाचे दूध व दुधजन्य पदार्थ घेवून वाशिम जिल्ह्यातील पुसद, दिग्रस परिसरात गेलेल्या वाहन चालक व क्लिनरने संगनमताने वाहनातील डिझेल चोरुन विक्री केली. ही चोरी करताना वाहतूक विभागाच्या डेप्युटी मॅनेजर यांनी पाळत ठेवून त्यांना रंगेहाथ पकडले. या प्रकरणी त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार चालक व क्लिनर तसेच डिझेल विकत घेणाऱ्या अभयखेडा, ता. मानोरा जि. वाशिम येथील किराणा दुकानदारावर संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघात डेप्युटी मॅनेजर या पदावर वाहतूक विभाग प्रमुख म्हणून काम करणारे अमीत सतीश गोडगे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, संघाच्या वाहतूक विभागात तीन-चार वर्षांपूर्वी चालक म्हणून रुजू झालेले संजय निवृत्ती आंबरे, रा. पिंपळगाव निपाणी, ता. अकोले यांच्याकडे मालवाहतूक ट्रक (एमएच. १७सीव्ही. ००५७) या वाहनाची जबाबदारी होती. संघातून राज्यभरात विविध जिल्ह्यांत दूध व दुग्धजन्य पदार्थ वाहतूक करणाऱ्या मालवाहतूक ट्रकचा रुट प्रत्येक महिन्याला बदलत असतो. मात्र आंबरे यांना नेमून दिलेल्या रुटवर इतरांपेक्षा जास्त इंधन लागत असल्याची बाब व्यवस्थापनाच्या लक्षात आली होती. त्यामुळे १६ ऑगस्ट रोजी पहाटे पावणेचार वाजता सदरचा एक राजहंस दूध संघातन बाहेर पडल्यानंतर गोडगे यांनी दुसऱ्या खासगी वाहनातून चालक रविंद्र चकोरसह पाठलाग सुरु केला. रात्री अकराच्या सुमारास मानोरा तालुक्यातील अभयखेडा गावातील माऊली किराणा अँड जनरल स्टोअर या दुकानाच्या समोर त्यांची ट्रक थांबल्याने आम्ही देखील त्यांच्या मागे काही अंतरावर थांबलो. तेव्हा चालक आंबरे व क्लीनर गिते यांनी वाहिकेच्या फिल्टरची नळी काढून त्याठिकाणी दुसरी नळी जोडून एका १५ लिटरच्या ड्रममध्ये डिझेल काढताना आढळून आले. त्याठिकाणी ५ हजार ९४० रुपये किंमतीचे एकूण ६० लिटर डिझेल किराणा दुकानदार चंद्रकांत राऊत यांना कमी भावात विकताना आम्ही रंगेहाथ पकडले.

याबाबत व्यवस्थापनाशी चर्चा करून संगमनेर शहर पोलीस ठाण्यात चालक संजय निवृत्ती आंबरे रा. पिंपळगाव निपाणी, ता अकोले, क्लीनर शांताराम रामचंद्र गिते रा. गणेशनगर व चंद्रकांत वसंत ग्राऊत रा. अभय खेडा गाव, ता. मानोरा, जि. वाशिम यांच्याविरुद्ध फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी कलम ३०३ (२), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल विजय मुंढे करीत आहेत.

या घटनेमुळे वाहनातील इंधनाच्या वापराबाबत व्यवस्थापनाच्या देखरेखीची गरज अधोरेखित झाली आहे. डिझेल चोरीप्रकरणी चालक, क्लिनर आणि डिझेल खरेदी करणाऱ्या दुकानदाराविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने आता पोलिस तपासातून या प्रकारामागे आणखी कोणी सहभागी आहे का, याचा तपास होण्याची शक्यता आहे.

# नोकरीच्या आमिषाने ६० लाखांची फसवणूक




युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- आरोग्य सेवक पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून बनावट कागदपत्रे तयार करत पाथर्डी तालुक्यातील अनेक तरूणांच्या नातेवाईकांकडून तब्बल ५९ लाख ५० हजार रूपये घेत फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी तालुक्यातील चुंभळी येथील सेवानिवृत्त नौदल कर्मचारी वैजीनाथ गहिनीनाथ ढाकणे (वय ६३) यांच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात कल्याण येथील दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जितेंद्र पुंडलीक वारगडे, रविकुमार उर्फ प्रविणकुमार राजेंद्रनाथ तिवारी अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. फिर्यादीनुसार, ढाकणे हे नौदलातून २०२४ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या दोन्ही मुलींचे शिक्षण पूर्ण झाले असून त्या नोकरीच्या शोधात होत्या. नौदलातील ओळखीचा जितेंद्र वारगडे याने नोव्हेंबर २०२४ मध्ये संपर्क साधून अहिल्यानगर, पुणे, छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद तसेच केडीएमसी ठाणे येथील आरोग्य सेवक व लिपिक पदांच्या भरती प्रक्रियेतील वेटिंग लिस्टमधील उमेदवारांना नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखविले. यासाठी प्रत्येकी १३ लाख रूपये द्यावे लागतील, असे सांगितल्याचा आरोप आहे.त्यानंतर कल्याण येथील एका हॉटेलमध्ये ढाकणे व अन्य व्यक्तींची वारगडे आणि तिवारी यांच्याशी भेट झाली. यावेळी नोकरी लावून देण्याचे आश्वासन देत रोख रक्कम घेण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पुढे ढाकणे, त्यांचे चुलत भाऊ, मेव्हणे, पुतणे व भाचे अशा अनेकांकडून तिवारी याच्या बँक खात्यावर आरटीजीएस तसेच फोन-पेच्या माध्यमातून लाखो रूपये पाठविण्यात आले.

फिर्यादीनुसार, ढाकणे यांनी स्वतः १५ लाख रूपये, तर त्यांच्या चुलत भावाने २० लाख ९९ हजार रूपये दिले. तसेच अन्य नातेवाईकांकडूनही लाखो रूपये घेण्यात आले. असे एकूण ५९ लाख ५० हजार रूपये दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फसवणूक करण्यासाठी संशयित आरोपींनी उमेदवारांना मुंबईतील जे. जे. रूग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी बोलावले. त्यासाठी ई-मेलवर पत्र पाठविण्यात आले होते. ५ मे २०२५ रोजी उमेदवारांना जे. जे. रूग्णालयात नेण्यात आले. तेथे तिवारी व अन्य एक व्यक्ती उपस्थित होते. त्यांनी वैद्यकीय अधिकार्यांना ई-मेल दाखवून उमेदवारांची नोंदणी व वैद्यकीय तपासणी करून घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्यानंतर ११ जुलै २०२५ रोजी तिवारी याने उमेदवारांची कथित अंतिम निवड यादी व्हॉट्सॲपवर पाठविली. मात्र, त्यानंतर फिर्यादी यांनी अहिल्यानगर जिल्हा परिषदेत चौकशी केली असता २०२३ मधील आरोग्य सेवक भरती प्रक्रियेत वेटिंग लिस्टमधील कोणत्याही उमेदवाराची नियुक्ती करण्यात आलेली नसल्याचे अधिकार्यांनी सांगितले. पुणे व छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेत चौकशी केली असता तेथेही अशीच माहिती मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादी व नातेवाईकांच्या लक्षात आले. त्यानंतर वैजीनाथ ढाकणे यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात धाव घेत वारगडे व तिवारी यांच्याविरूध्द फिर्याद दिली.

# बंद घरावर चोरट्यांचा डल्ला



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - घरमालक नोकरीनिमित्त बाहेरगावी राहत असल्याने बंद असलेले घर हेरून अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोयंडा व कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील गोदरेजचे लोखंडी कपाट फोडून कपड्यांखाली प्लास्टिकच्या डब्यात ठेवलेली तब्बल ५ लाख रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याची धक्कादायक घटना संगमनेर तालुक्यातील कहे येथे घडली.

सुनील लक्ष्मण सानप (वय ४९, मूळ रा. कहे, ता. संगमनेर, सध्या रा. मीरा रोड, मुंबई) यांच्या बंद घराला चोरट्याने लक्ष्य केले. १४ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजेपासून ते २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत ही घरफोडी झाल्याचे समोर आले आहे. घर बंद असल्याचा फायदा घेत चोरट्याने मुख्य दरवाजाचा कडी-कोयंडा व कुलूप तोडले. त्यानंतर घरातील गोदरेजचे लोखंडी कपाट फोडून कपड्यांखाली ठेवलेल्या प्लास्टिकच्या डब्यातील सुमारे पाच लाख रुपयांची रोकड लंपास केली.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे आणि पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. चोरीच्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, बंद घरांची रेकी करून चोरी करणाऱ्या टोळीचा सहभाग आहे का, याबाबतही पोलीस तपास करत आहेत. सानप यांच्या फिर्यादीवरून संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४९५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३३१ (३), ३३१ (४) आणि ३०५ नुसार घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश शिंदे करीत आहेत.

# जेन झी ने शिव्यांची नव्हे तर ओव्यांची संगत धरावी - ह.भ.प. परांजपे

## दुसऱ्या दिवशीही व्याख्यानमालेस उदंड प्रतिसाद



युवावार्ता (प्रतिनिधी) :

संगमनेर - ' जेन झी ही आपल्या राष्ट्राची मोठी संपत्ती व शक्ती आहे. या युवाशक्तीच्या बलशाली खांद्यांवरच प्रगतीची पालखी आपल्याला पुढे न्यायची आहे त्यामुळे जेन झी ने शिव्यांची नव्हे तर संतांच्या ओव्यांची संगत धरावी. शिव्या बिघडवतात आणि ओव्या घडवतात याची जाणीव सदैव मनात ठेवली तर जेन झी चे जीवन नक्कीच कृतार्थ होईल. सोन्यासारखे आयुष्य मातीमोल होऊ नये म्हणून जन्मदात्या मातेशी आणि भारत भूमीच्या मातीशी एकरूप राहणाऱ्या तरुणाईचा विजयध्वज कायम आकाशात उंच फडकत राहील' असा विश्वास महाराष्ट्रातील ख्यातकीर्त कीर्तन प्रवचनकार, समाज प्रबोधनकार ह. भ. प. रोहिणीताई परांजपे यांनी येथे केले. राजस्थान युवक मंडळाच्या वतीने श्रावण मासानिमित्त सलग पाचव्या वर्षी मन:शांती व जीवनविकास व्याख्यानमाला आयोजित आली आहे. व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प 'विश्व स्वधर्म सूर्ये पाहो 'या विषयावर गुंफताना सौ. परांजपे यांनी वरील प्रतिपादन केले. मालपाणी लॉन्सच्या उत्सव सभागृहामध्ये आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्यानास श्रोत्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. सुमारे दीड तास चाललेल्या या कीर्तनात वक्ता आणि श्रोता एकरूप झाल्याचे अद्भुत दर्शन झाले. श्रोत्यांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद बघून 'संगमनेर मध्ये श्रावणातच संत विचारांची दिवाळी साजरी करण्याचा योग आला अशी प्रारंभिक टिप्पणी भावना व्यक्त करताच श्रोत्यांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला आणि तिथून पुढे दीड तास श्रोत्यांची अक्षरशः ब्रह्मानंदी टाळी लागली.

‘अवघ्या ३९ वर्षांचे आयुष्य लाभलेले योद्धा संन्यासी स्वामी विवेकानंद हे विवेकातून केलेल्या वक्तव्यामुळे जगाचे हिरो ठरले.तेजस्विता, तत्परता आणि तन्मयता ही तारुण्याची लक्षणे असल्याचे त्यांनी सांगितले वसुधैव कुटुम्बकम असे सांगत संपूर्ण विश्वाला परिवाराच्या धाग्यामध्ये बांधणारे ते जगातले पहिले वक्ते ठरले. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज,लोकमान्य टिळक, चाफेकर बंधू स्वातंत्र्यवीर सावरकर बलोपासनेचा संदेश देणारे समर्थ रामदास स्वामी या सर्वांनी तरुणपणातच ध्येय निश्चित करून आपापल्या वाट्याला आलेले संपूर्ण आयुष्य देव,देश आणि धर्माला समर्पित केले. त्यातूनच हे राष्ट्र घडले याची जाणीव तरुणाईने ठेवली पाहिजे. विवेकानंदांनी सांगितल्याप्रमाणे उठा जागे व्हा आपल्याला काय प्राप्त करायचे आहे ते समजावून घ्या अशा रीतीने वागल्यास त्यांच्या योगदानाच्या बळावर आपले राष्ट्र सर्वश्रेष्ठ झाल्याशिवाय राहणार नाही' असे सौ .परांजपे म्हणाल्या. सौ. परांजपे यांच्या प्रभावी वक्तृत्व शैलीला आणि सुमधुर गायन कलेला त्याचप्रमाणे वेळोवेळी केलेल्या मिश्किल टिप्पणी ला श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

भर्तृहरी, शुकदेव, महर्षी व्यास येथ पासून तर संत ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान काका, मुक्ताई, शांतीब्रह्म संत एकनाथ, जगद्गुरु तुकोबाराय अशा सर्व संत महंतांच्या उपदेशामृताचा त्यांनी सुंदर भावार्थ रसिकांना उलगडून दाखविला. प्रत्येक गोष्टीवर संशय घेणाऱ्या माणसाला आयुष्यात कधीच सुख लाभत नाही. त्यामुळे मी संदेह व्हावे आणि प्रभुला शरण जावे. प्रत्येक घरातील माता-पिता म्हणजे विठ्ठल रुक्मिणी आहेत. ते सर्वश्रेष्ठ तीर्थ आहेत. त्यांना रोज नमस्कार करण्याची सवय तरुणांनी लावून घेतल्यास त्यांना त्या आशीर्वादामुळे आयुष्यात काहीही कमी पडणार नाही ' असे त्या म्हणाल्या

कीर्तनाच्या ओघामध्ये 'येरे बा विठ्ठला' शिवतांडव स्तोत्र , त्याचप्रमाणे अंगावर रोमांच उभे करणारे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे ‘जयोस्तुते’ अत्यंत आवेशात सादर केल्याने सभागृहामध्ये हजारो श्रोत्यांनी ‘भारत माता की जय ' वंदे मातरम ! चा गगनभेदी जयघोष केला. कार्यक्रमाची सुरुवात वंदे मातरम् च्या गायनाने झाली. कार्यक्रमासाठी राजस्थान युवक मंडळाचे अध्यक्ष मनीष मालपाणी, कार्याध्यक्ष सागर मणियार, उपाध्यक्ष कल्पेश मर्दा, कृष्णा आसावा, वेणुगोपाल कलंत्री. सुवर्णा मालपाणी, राजेश मालपाणी, डॉ. संजय मालपाणी, सौ. रचना मालपाणी आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# वीज कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ भविष्य निर्वाह निधी ट्रस्टच्या परिपत्रक क्र. २४८ मुळे महावितरण, महानिर्मिती व महापारेषणमधील कर्मचाऱ्यांची Refundable CPF advance सुविधा बंद करण्यात आल्याचा आरोप महाराष्ट्र वीज कामगार महासंघाने केला आहे. या निर्णयामुळे सुमारे एक लाख वीज कर्मचाऱ्यांच्या आर्थिक हितावर परिणाम होणार असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

महासंघाचे महामंत्री अरुण पिवळ यांनी सांगितले की, कामगार संघटनांशी चर्चा न करता हा निर्णय घेण्यात आला असून, वैद्यकीय उपचार, शिक्षण, विवाह व इतर आपत्कालीन गरजांसाठी कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे परिपत्रक क्र. २४८ तातडीने मागे घेऊन पूर्वीप्रमाणे Refundable Advance सुविधा सुरू ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याबाबत उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जा विभागाचे सचिव तसेच तिन्ही वीज कंपन्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांना निवेदने देण्यात आली आहेत. मागणी मान्य न झाल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महासंघाचे अध्यक्ष विठ्ठल भालेराव, कार्याध्यक्ष संजय दंडारे व संघटनमंत्री सचिन पाटील यांनी दिला आहे.

# संपादकीय...

## राष्ट्रीय अंतराळ दिवस

## आकाशाला गवसणी घालणाऱ्या भारताची गौरवगाथा

भारताच्या वैज्ञानिक प्रगतीचा आणि आत्मनिर्भरतेचा गौरवशाली अध्याय म्हणजे भारतीय अंतराळ संशोधन कार्यक्रम. आकाशाला गवसणी घालण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारताने अत्यंत मर्यादित साधनसामग्रीतून सुरुवात करून आज जगातील आघाडीच्या अंतराळ शक्तींमध्ये स्थान निर्माण केले आहे. भारताच्या या ऐतिहासिक प्रवासाची आठवण करून देण्यासाठी दरवर्षी २३ ऑगस्ट हा 'राष्ट्रीय अंतराळ दिवस' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ वैज्ञानिक यशाचा उत्सव नसून देशातील तरुणांना विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन क्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. राष्ट्रीय अंतराळ दिवसाचे महत्त्व भारताच्या चांद्रयान-३ मोहिमेशी जोडलेले आहे. २३ ऑगस्ट २०२३ रोजी भारताच्या चांद्रयान-३ मोहिमेतील 'विक्रम' लँडरने चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशाजवळ यशस्वी सॉफ्ट लँडिंग केले. या यशामुळे भारत चंद्रावर यशस्वीपणे सॉफ्ट लँडिंग करणारा जगातील चौथा देश ठरला आणि चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशाजवळ पोहोचणारा पहिला देश बनला. या ऐतिहासिक कामगिरीने संपूर्ण जगाचे लक्ष भारताच्या अंतराळ क्षमतेकडे वेधले. भारताच्या अंतराळ कार्यक्रमाची पायाभरणी डॉ. विक्रम साराभाई यांच्या दूरदृष्टीने झाली. १९६०च्या दशकात भारताकडे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि मोठ्या प्रमाणावर आर्थिक साधने उपलब्ध नव्हती. मात्र, अंतराळ तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ प्रतिष्ठेसाठी नव्हे, तर देशाच्या विकासासाठी व्हावा, अशी भूमिका भारतीय शास्त्रज्ञांनी घेतली. त्यातून भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच खडळजची वाटचाल सुरू झाली. उपग्रह तंत्रज्ञानाचा वापर भारताने हवामान अंदाज, दूरसंचार, दूरदर्शन प्रसारण, शेती, मत्स्यव्यवसाय, आपत्ती व्यवस्थापन आणि शिक्षण अशा अनेक क्षेत्रांत केला. भारतीय अंतराळ कार्यक्रमाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा विकास तुलनेने कमी खर्चात करण्याची क्षमता. त्यामुळे भारताने जागतिक अंतराळ क्षेत्रात 'किफायतशीर आणि प्रभावी अंतराळ मोहिमा' राबविणारा देश अशी वेगळी ओळख निर्माण केली. चांद्रयान मालिकेने भारताच्या अंतराळ संशोधनाला नवी दिशा दिली. चांद्रयान-१ मोहिमेने चंद्राच्या पृष्ठभागावर पाण्याच्या अस्तित्वासंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती मिळवून दिली. त्यानंतर चांद्रयान-२ मोहिमेत आलेल्या अडचणींमधून भारतीय शास्त्रज्ञांनी धडे घेतले. त्याच अनुभवाच्या आधारावर चांद्रयान-३ मोहिमेची रचना अधिक सक्षम पद्धतीने करण्यात आली. अखेर २३ ऑगस्ट २०२३ रोजी भारताने चंद्राच्या पृष्ठभागावर ऐतिहासिक यश मिळवले. चांद्रयान-३ मोहिमेतील 'प्रज्ञान' रोव्हरने चंद्राच्या पृष्ठभागावर फिरून विविध वैज्ञानिक निरीक्षणे केली. चंद्रावरील माती आणि वातावरणाशी संबंधित माहिती गोळा करण्यात या मोहिमेने महत्त्वाची भूमिका बजावली. या यशामागे हजारो वैज्ञानिक, अभियंते, तंत्रज्ञ आणि इतर कर्मचाऱ्यांचे अथक परिश्रम होते. त्यामुळे राष्ट्रीय अंतराळ दिवस हा केवळ एका मोहिमेचा उत्सव नसून भारतीय वैज्ञानिक समुदायाच्या सामूहिक प्रयत्नांना दिलेली मानवंदना आहे. भारताची अंतराळ भरारी चंद्रापुरती मर्यादित नाही. मंगळयान मोहिमेने भारताची ग्रह संशोधनातील क्षमता सिद्ध केली. भारताने पहिल्याच प्रयत्नात मंगळाच्या कक्षेत यान पोहोचवून उल्लेखनीय कामगिरी केली. त्याचबरोबर आदित्य-ङ१ मोहिमेद्वारे सूर्याचा अभ्यास करण्याच्या दिशेने भारताने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. गगनयान मोहिमेद्वारे भारतीय अंतराळवीरांना मानवी अंतराळ मोहिमेत पाठविण्याचे स्वप्नही साकारण्याच्या दिशेने देशाची वाटचाल सुरू आहे. .


**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ जन्म नोंद/४१२/२०२६ दिनांक - २०/०८/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री.बशीर युसुफ जमादार , रा.राजुरी ता.जुन्नर, जि.पुणे** यांनी दिनांक १२/०९/२०२५ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. राजुरी, ता.जुन्नर, जि.पुणे** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: नामे बशीर युसुफ जमादार यांचा **जन्म मौजे** कुरकुंडी, **ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक २६/०५/१९६४** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कुरकुंडी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कुरकुंडी यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुट्टीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


# मालपाणी विद्यालयाच्या सर्वांगीण विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्वाचे - अ‍ॅड. कल्याण कासट

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मालपाणी विद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थ्यांचा सहभाग अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने माजी विद्यार्थी संघाची सहविचार सभा शुक्रवार, दिनांक २१ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. संघाचे अध्यक्ष ड. कल्याण कासट व डॉ. अमित ढोले यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सभेच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम एरंडे होते.




सभेत विद्यालयाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच पायाभूत विकासाच्या दृष्टीने विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना अधिकाधिक गुणवत्तापूर्ण व आधुनिक शिक्षण मिळावे, त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा तसेच विद्यालयाच्या प्रगतीत माजी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढावा, यासाठी अनेक उपयुक्त सूचना मांडण्यात आल्या.

माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाशी असलेले आपले ऋणानुबंध कायम ठेवत विद्यालयाच्या विकासासाठी विविध उपक्रमांमध्ये योगदान देण्याची भावना व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी भविष्यात विविध उपक्रम राबविण्याबाबतही विचारविनिमय करण्यात आला.

यावेळी विद्यालयाचा माजी विद्यार्थी कै. अक्षय जगताप यांच्या निधनाबद्दल उपस्थितांनी दु:ख व्यक्त करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

सभेत माजी विद्यार्थी संघाच्या पुढील कार्याचा आढावा घेऊन विद्यालयाच्या प्रगतीसाठी संघाच्या माध्यमातून अधिक सक्रियपणे काम करण्याचा निर्धार करण्यात आला. माजी विद्यार्थी, शिक्षक व विद्यालय प्रशासन यांच्या समन्वयातून विद्यालयाच्या विकासाला निश्चितच नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# प्रा. ज्योती दशरथ हासे यांना पीएच. डी. पदवी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील राजापूर येथील कन्या डॉ. ज्योती दशरथ हासे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. 'महेश एलकुंचवार यांच्या निवडक नाटकांतील सामाजिक-सांस्कृतिक दृष्टीकोनांचा अभ्यास' हा त्याच्या संशोधनाचा विषय होता. सध्या ते महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे.



प्रा. ज्योती हासे यांनी हे संशोधन मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई, ता. नेवासा येथे प्रा. डॉ. मच्छिंद्र वर्पे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. संशोधनादरम्यान संगमनेर महाविद्यालयातील प्रा. डॉ. जगदीश जगदाळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या त्याच्या यशासाठी वडील दशरथ हासे, पती दर्शन पवार तसेच संस्थेचे मार्गदर्शक माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, संस्थेचे अध्यक्ष माजी आ. डॉ. सुधीर तांबे, सचिव मा. अ‍ॅड. सुमंत कोल्हे, प्रा. बाबा खरात, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या यशासाठी डॉ. बाळासाहेब मुरादे, माजी मंडळ कृषी अधिकारी नामदेव हासे, डॉ. राजू शेख यांनी अभिनंदन केले आहे. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी यश संपादन केले असल्याने राजपूर व पंचक्रोशीत त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# 'इंद्रिय आरोग्य : स्वस्थ इंद्रिय, स्वस्थ भारत' विषयावरील भव्य आयुर्वेद प्रदर्शन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महर्षी चरक जयंतीच्या औचित्याने सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालय, संगमनेर येथील संस्कृत क्लब, संस्कृत संहिता सिद्धांत विभागाच्या वतीने दिनांक २० ऑगस्ट रोजी 'इंद्रिय आरोग्य : स्वस्थ इंद्रिय, स्वस्थ भारत' या अभिनव व जनजागृतीपर विषयावर आयुर्वेद प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रदर्शनामध्ये पंचज्ञानेंद्रिये व मन यांच्या आरोग्याचे महत्त्व, त्यांची सामान्य कार्ये, इंद्रियविकारांची लक्षणे, विविध आजार तसेच उपलब्ध आयुर्वेदिक उपचारपद्धती आणि इंद्रियांचे आरोग्य जपण्यासाठी आवश्यक प्राथमिक काळजी याविषयी विद्यार्थ्यांनी प्रभावी पद्धतीने माहिती सादर केली. या प्रदर्शनात विविध कार्यरत प्रतिकृती, माहितीपूर्ण चार्ट्स, प्रात्यक्षिके, शैक्षणिक खेळ, लघुनाट्ये व विविध अभिनव उपक्रमांद्वारे विषयाचे सादरीकरण करण्यात आले.

या प्रदर्शनास श्री श्री रविशंकर विद्या मंदिर, संगमनेर तसेच अमृतेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, संगमनेर खुर्द येथील विद्यार्थ्यांनी भेट देऊन प्रदर्शनाची माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल्सवरील प्रात्यक्षिकांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. इंद्रियांचे आरोग्य, दैनंदिन जीवनातील योग्य सवयी आणि आयुर्वेदाच्या माध्यमातून इंद्रियांचे संरक्षण याबाबत विद्यार्थ्यांमध्ये प्रभावी जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमाच्या समारोप व पारितोषिक वितरण समारंभास श्री श्री रविशंकर विद्या मंदिर, संगमनेरच्या प्राचार्या सौ. आरती सप्रा प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते विविध पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी १८ ऑगस्ट २०२६ रोजी जागतिक संस्कृत दिनाच्या औचित्याने संस्कृत क्लब, संस्कृत संहिता सिद्धांत विभागाच्या वतीने आयोजित संस्कृत सुलेखन स्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. तसेच प्रदर्शनातील सर्व स्टॉल्समधील विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सहभागाचे कौतुक करून सर्व स्टॉल्सना प्रशस्तीपर पुरस्कार देण्यात आले. त्याचबरोबर उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या स्टॉलला पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. जयश्री सराफ यांनी भूषविले. कार्यक्रमास डॉ. नैमिष सराफ, व्यवस्थापकीय विश्वस्त; डॉ. ऋता सराफ, सदस्य डॉ. सुयोग व्यास, प्राचार्य, सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालय यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. दिनकर पडाडे, तसेच विभागातील डॉ. पल्लवी जोशी, डॉ. अबोली गांधी, डॉ. जयश्री खांडगे व डॉ. अमित अहिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सिंहस्थ महाकुंभमेळा २०२७ ची तयारी वेगात

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - सिंहस्थ महाकुंभमेळा २०२७च्या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने साधुग्राम आणि मंडप व्यवस्थेचा आढावा घेतला. तात्पुरत्या सुविधा, पाणी-वीज, स्वच्छता, निचरा, सुरक्षा, आरोग्य आणि विविध विभागांमधील समन्वय यांचे एकात्मिक नियोजन करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस नाशिक महापालिका आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, शहर अभियंता संजय अग्रवाल यांच्यासह कुंभमेळा प्राधिकरण, पोलिस, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अन्य विभागांचे अधिकारी उपस्थित होते. २०१५च्या कुंभमेळ्यात प्रत्यक्ष काम केलेले निवृत्त महापालिका अधिकारीही बैठकीत सहभागी झाले.

साधुग्राममधील आखाड्यांचे मंडप, पंडाल, सार्वजनिक निवास व्यवस्था, कुंभमेळा व सेक्टर कार्यालये, व्हीआयपी कॅम्प यांसह पाणीपुरवठा, वीज, मलनिस्सारण, स्वच्छता, निचरा, रुग्णालये, प्रथमोपचार, पोलिस आणि अग्निशमन व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. विविध विभागांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्याचे काम सुरू असल्याची माहिती देण्यात आली.: सिंहस्थ महाकुंभमेळा २०२७च्या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने साधुग्राम आणि मंडप व्यवस्थेचा आढावा घेतला. तात्पुरत्या सुविधा, पाणी-वीज, स्वच्छता, निचरा, सुरक्षा, आरोग्य आणि विविध विभागांमधील समन्वय यांचे एकात्मिक नियोजन करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस नाशिक महापालिका आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, शहर अभियंता संजय अग्रवाल यांच्यासह कुंभमेळा प्राधिकरण, पोलिस, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अन्य विभागांचे अधिकारी उपस्थित होते. २०१५ च्या कुंभमेळ्यात प्रत्यक्ष काम केलेले निवृत्त महापालिका अधिकारीही बैठकीत सहभागी झाले.


**छोट्या जाहिरातासाठी संपर्क करा**

८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४ ७६२०३८८२३०

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME IS RUKHSANA EBRAHIM TAMBOLI

NEW NAME AS SADEKA ANIS TAMBOLI

ADD – 837,KUMBHAR LANE AT POST- SANGAMNER TAL - SANGAMNER, DIST - AHMEDNAGAR

**पाहिजेत**

जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी

सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २

मेन रोड, संगमनेर

7588249849

**पाहिजेत**

राजवीर फार्मा

मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा

पुरुष – ४ जागा

रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस

ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर

8669184141

**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५

पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

7709828846

**पाहिजेत**

डी. एम. मुळे चष्मावाला

त्वरीत माणसे भरणे आहे

पुरुष - ४ जागा

आकर्षक पगार

प्रत्यक्षात येऊन भेटावे

पत्ता- पडताणी कॉम्पलेक्स, संगमनेर

**पाहिजेत**

सुंदरम गोल्ड आणि प्लास्टिक, संगमनेर

ऑफसेट मशिन ऑपरेटर १ जागा
स्क्रिन प्रिटींग – २ जागा
टेलीकॉलर – २ (महिला)

– संपर्क –
९८२२४५३०३६

**JOB**

SR THORAT | GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar

Mobile Number – 9860100936/937

Sent the CV Following E-Mail Id:

admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com




**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी

अकाऊंटंट - 2 जागा
पुरुष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक

कामाचा अनुभव आवश्यक

८९९९८६२७५९

**SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL**

नेवासकर ऑटोमोबाईल्स

**पाहिजेत**

सर्व्हीस सुपरव्हायझर
२ जागा

संगमनेर
8793223344
8446300400

**फ्लॅट विकणे आहे**

2 BHK फ्लॅट विकणे आहे नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह

ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर

– संपर्क –
8788945208
8208223721

# होमगार्ड बनणार आता पोलिस वाहनचालक !

## अहिल्यानगर जिल्ह्याला मिळणार १०० प्रशिक्षित वाहनचालकांची मदत



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्यातील प्रशिक्षित होमगार्ड जवानांना आता पोलिस दलातील वाहनचालक म्हणून काम करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. राज्यातील विविध पोलिस घटकांकडून प्राप्त झालेल्या मागणीनुसार पहिल्या टप्प्यात १ हजार १५० वाहनचालक होमगार्डना सहा महिन्यांसाठी पोलिस घटकांमध्ये तैनात करण्यास मान्यता देण्यात आली आहे. विशेष म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यासाठी १०० होमगार्ड वाहनचालक उपलब्ध होणार असल्याने जिल्हा पोलिस दलातील वाहनचालकांची कमतरता काही प्रमाणात दूर होण्यास मदत होणार आहे.

गृह विभागाने ३० जून रोजी दिलेल्या मान्यतेनंतर पोलिस महासंचालक कार्यालयाने राज्यातील विविध पोलिस घटकांकडून वाहनचालक होमगार्डची मागणी मागविली होती. त्यानुसार राज्यभरातील पोलिस घटकांनी तब्बल १ हजार ९०५ वाहनचालक होमगार्डची आवश्यकता असल्याचे कळविले. मात्र, उपलब्धतेनुसार पहिल्या टप्प्यात १ हजार १५० होमगार्डना तैनात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वाहनचालक म्हणून नियुक्ती होणाऱ्या होमगार्ड जवानांना संबंधित पोलिस घटक प्रमुखांच्या समन्वयाने चार आठवड्यांचे आवश्यक वाहनचालक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी एकूण २ हजार ३०० होमगार्डची निवड करण्यात येणार असून, प्रशिक्षण कालावधीत त्यांना नियमानुसार भोजन भत्ता आणि खिसाभत्ता मिळणार आहे. प्रशिक्षण पूर्ण करून कर्तव्यावर रुजू झाल्यानंतर उपस्थितीनुसार त्यांना नियमानुसार कर्तव्यभत्ता देण्यात येणार आहे.

पोलिस दलाच्या दैनंदिन कामकाजात वाहनचालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. रात्रगस्त, पोलिस बंदोबस्त, तपास पथकांची ने-आण, आरोपींना न्यायालयात किंवा इतर ठिकाणी नेणे, घटनास्थळी तातडीने पोहोचणे, बिट मार्शल, व्हीआयपी बंदोबस्त तसेच डायल ११२च्या वाहनांवर वाहनचालकांची आवश्यकता असते. अनेक पोलिस घटकांमध्ये वाहनचालकांची कमतरता जाणवत असल्याने प्रशिक्षित होमगार्डना ही जबाबदारी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात मिळणाऱ्या १०० होमगार्ड वाहनचालकांचा पोलिस दलाच्या दैनंदिन कामकाजाला मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

पहिल्या टप्प्यातील १ हजार १५० होमगार्डचा सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यांचा खंड देऊन दुसऱ्या टप्प्यात उर्वरित १ हजार १५० प्रशिक्षित होमगार्डना तैनात करण्यात येणार आहे. अशा प्रकारे वर्षभरात दोन टप्प्यांत एकूण २ हजार ३०० प्रशिक्षित होमगार्डना वाहनचालक म्हणून काम करण्याची संधी मिळणार आहे.

या निर्णयामुळे एका बाजूला पोलिस दलातील वाहनचालकांची कमतरता दूर करण्यास मदत होणार असून, दुसऱ्या बाजूला प्रशिक्षित होमगार्ड जवानांना कौशल्याचा उपयोग करून घेण्याची आणि पोलिस दलासोबत प्रत्यक्ष काम करण्याची नवी संधी उपलब्ध झाली आहे.

# शिरूरमध्ये नोकरीच्या आमिषाने तरुणीवर सामुहिक अत्याचार



युवावार्ता (प्रतिनिधी)

शिरूर - जास्त व चांगल्या पैशांचे काम देण्याच्या बहाण्याने एका परप्रांतीय तरूणीला येथे बोलावून तीला दोन दिवस एका लॉजमध्ये ठेवून सामूहिक अत्याचार केल्याप्रकरणी शिरूर पोलिसांनी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित २२ वर्षीय पिडीतेने दिलेल्या फिर्यादीवरून दीपक श्रीमंदिलकर (रा. जुने शिरूर, ता. शिरूर), अजय माणिक घेगडे (रा. माठ, ता. श्रीगोंदे, जि. अहिल्यानगर), दीपक दत्तात्रेय भोसले व अनिकेत दिलीप पठारे (दोघे रा. मावळेवाडी, १ ता. पारनेर, जि. अहिल्यानगर),

ऋषिकेश रामदास ढवळे व सागर राधू ढवळे (दोघे रा. ढवळगाव, या. श्रीगोंदे, जि. अहिल्यानगर) व एक अनोळखी व्यक्ती यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल झाला असून, अनिकेत पठारे याला पोलिसांनी अटक केली आहे. शिरूर न्यायालयाने त्याला सोमवारपर्यंत पोलिस कोठडी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मूळची छत्तीसगड राज्यातील तरुणी सध्या चाकण येथे वास्तव्यास होती. संबंधित तरूणांनी तिच्याशी संपर्क साधून चांगल्या पैशांचे काम देण्याचे आमिष दाखवून आपल्या मोटारीतून शिरूरला आणले. बुधवारी माव्र्हल इन लॉजवर नेऊन नशा येणारी पांढऱ्या रंगाची पावडर खायला दिली व तेथीलच एका खोलीमध्ये दोन दिवस वेळोवेळी अत्याचार केले.

दरम्यान, शुक्रवारी या तरुणीने पोलिस मदत नियंत्रण कक्षाच्या ११२ क्रमांकावर संपर्क साधून आपल्यावरील अत्याचाराची माहिती देत मदतीची याचना केली. स्थानिक पोलिसांना याबाबत माहिती कळताच पोलिस निरीक्षक विनोद पाटील, पोलिस उपनिरीक्षक हणमंत नकाते, पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांनी संबंधित लॉजवर जाऊन तरूणीची सुटका केली. तिने दिलेल्या फिर्यादीवरून सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# घारगाव आरोग्य केंद्राची तपासणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर-नाशिक दौऱ्यावर असताना राज्याचे आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड आणि हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग विभागाचे सहसंचालक डॉ. संदीप सांगळे यांनी शुक्रवारी संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील घारगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला आकस्मिक भेट दिली. यावेळी आरोग्य सेवा व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.

या भेटीदरम्यान अधिकाऱ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रातील स्वच्छता, कर्मचाऱ्यांची उपस्थिती, औषध भांडार, सर्वसाधारण व प्रसूती कक्ष, शस्त्रक्रिया कक्ष तसेच तथा

प्रयोगशाळेची पाहणी केली. ई-औषधी, एचएमआयएस व एएनसी ट्रॅकिंग या ऑनलाईन प्रणालींच्या कामकाजाचीही तपासणी करण्यात आली. केंद्रात दरमहा सरासरी तीन ते चार प्रसूती होत असून शस्त्रक्रिया कक्ष नियमित सुरू आहे. मागील चार नियोजनाच्या ३१ शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. तसेच आवश्यक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे महिन्यांत कुटुंब

पाहणीत आढळून आले. यावेळी गर्भवती महिलांच्या नोंदी अद्ययावत ठेवण्याच्या सूचना त्यांनी आरोग्य केंद्रातील अधिकाऱ्यांना दिल्या. हिवताप व डेंग्यू प्रतिबंधासाठी कंटेनर सर्वेक्षण प्रभावीपणे राबविण्यासह डासांची उत्पत्तीस्थळे रोखण्याचे निर्देश देण्यात आले. प्रयोगशाळेत अधिकाधिक इन-हाऊस तपासण्या करण्यावर भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या. केंद्रातील सुविधा, आरोग्य सेवा आणि राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या कामकाजाबाबत अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. कामेश टावरे, डॉ. अक्षय शिंदे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# २ वर्षांत ७३ लाख शेतकऱ्यांनी सोडली पीक विमा योजना

पंतप्रधान पीकविमा योजना शेतकऱ्यांसाठी पीक खराब झाल्यास आर्थिक सुरक्षा कवच म्हणून सुरू करण्यात आली होती. पण योजना ऐच्छिक झाल्यानंतर अनेक राज्यांमध्ये याच्याशी जोडलेल्या शेतकऱ्यांच्या संख्येत घट झाली आहे. केवळ दोन वर्षांत ७३ लाख (२९.६%) शेतकरी या योजनेतून बाहेर पडले आहेत. सर्वात मोठी तक्रार क्लेमचे आकलन, पैसे देण्यास होणारा विलंब आणि वास्तविक नुकसानीच्या तुलनेत मिळणारी कमी भरपाई याबाबत आहे.

पीकविमा योजना २०१६ मध्ये सुरू झाली होती. प्रचार-प्रसारासाठी १० वर्षांत ६६४ कोटी रुपये खर्च झाले. सुरुवातीला अधिसूचित पिकांसाठी कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना विमा घेणे अनिवार्य होते. शेतकऱ्याच्या खात्यात आधारभूत किमतीने विक्रीचे पैसे येताच बँक प्रीमियम कापून घेत असे. २०२० मध्ये ती ऐच्छिक करण्यात आली. तेव्हापासून शेतकरी पाठ फिरवू लागले आहेत. २०२३ मध्ये देशात विक्रमी ३.१४ कोटी हेक्टर शेतजमीन विमित होती. आता सुमारे २.१८ कोटी हेक्टर उरली आहे. विशेष बाब म्हणजे दोन वर्षांत योजनेतून बाहेर पडणारी



टॉप-६ राज्ये भाजपशासित आहेत. पीएम पीक विमा योजनेसाठी १८ विमा कंपन्या सूचीबद्ध आहेत. यामध्ये ५ सरकारी आहेत. या योजनेतून बाहेर पडलेल्या शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, योजनेअंतर्गत शेतकरी खरीपाच्या अन्नधान्य आणि गळित धान्यासाठी विमित रकमेच्या कमाल २%, रब्बीसाठी १.५% प्रीमियम देतो.

प्रीमियमचा मोठा हिस्सा राज्य आणि केंद्र सरकार देते. त्यानंतरही शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यावर जो क्लेम मिळतो, तो त्यांच्या वाट्याला येणाऱ्या प्रीमियमपेक्षा कमी असतो. पूर्वी पीक कापणी प्रयोगांतून तलाठी क्लेम ठरवत असत, त्यानंतर नुकसानीच्या आकलनासाठी सॅटेलाइटची मदत घेतली जात आहे. पण परिस्थिती सुधारण्याऐवजी बिघडत चालली आहे. शेतकरी तलाठी, तहसीलदार आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या चकरा मारत राहतो. महाराष्ट्रात दोन वर्षांत विक्रमी ३६.८३ लाख शेतकरी पीकविम्यातून बाहेर पडले. ही संख्या घटून ४१.३० लाख राहिली आहे.

## दिनविशेष

२०१२: व्हॉयेजर १ — अंतराळयान आंतरतारकीय अवकाशात प्रवेश करणारी पहिली मानवनिर्मित वस्तू बनली.

१९९१: बेलारूस — देशाला सोव्हिएत युनियनपासून स्वातंत्र्य मिळाले.

१९८९: व्हॉयेजर २ — अंतराळयान नेपच्यून ग्रहाच्या सर्वात जवळ पोहोचले.

१९८१: व्हॉयेजर २ — अंतराळयान शनी ग्रहाच्या सर्वात जवळ पोहोचले.

१९८०: झिम्बाब्वे — देश संयुक्त राष्ट्रात सामील झाला.

१९४५: दुसरे महायुद्ध — संपल्यानंतर दहा दिवसांनी जपानने शरणागतीची घोषणा केली.

१९४४: दुसरे महायुद्ध — मित्र राष्ट्रांनी पॅरिस शहर मुक्त केले.

१९४२: दुसरे महायुद्ध — पूर्व सोलोमनची लढाई: जपानी नौदल वाहतूक काफिला मित्र राष्ट्रांच्या हवाई हल्ल्याने मागे वळला.

१९४०: दुसरे महायुद्ध — ब्रिटीश रॉयल एअर फोर्सने बर्लिन, जमर्नी शहरावर बॉम्बहल्ला

## जन्म

१९९४: काजोल आयकट — भारतीय लेखक आणि कादंबरीकार

१९७६: जावेद कादीर — पाकिस्तानी क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक

१९६९: विवेक राजदान — भारतीय क्रिकेटपटू, प्रशिक्षक आणि स्पोर्ट्सकास्टर

१९६५: संजीव शर्मा — भारतीय क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक

१९६३: मिरो सरार — स्लोव्हेनिया देशाचे ८वे पंतप्रधान, स्लोव्हेनियन वकील आणि राजकारणी

१९६२: डॉ. तस्लिमा नसरीन — बांगलादेशी स्त्रीमुक्तीवादी लेखिका

१९५२: दुलीप मेंडिस — श्रीलंकेचे क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक

१९४१: अशोक पत्की — संगीतकार

१९३६: गिरिधारीलाल केडिया — इमेज इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ऍण्ड मॅनेजमेंटचे संस्थापक (निधन: १९ डिसेंबर २००९ )

१९३०: शॉन कॉनरी — जेम्स बाँडच्या भूमिकांमुळे गाजलेले अभिनेते

१९२८: हर्बर्ट क्रोमर — जर्मन-अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ, अभियंते

## मृत्यू

३८३: ग्रॅटियन — रोमन सम्राट (जन्म: १८ एप्रिल ३५९ )

२०१३: रघुनाथ पनिग्राही — भारतीय गायक-गीतकार (जन्म: १० ऑगस्ट १९३२ )

२०१२: नील आर्मस्ट्राँग — अमेरिकन अंतराळवीर आणि चंद्रावर पाऊल ठेवणारे पहिले मानव — राष्ट्रपती स्वातंत्र्य पदक, काँग्रेसचे अंतराळ सन्मान पदक, नासाचे विशिष्ट सेवा पदक (जन्म: ५ ऑगस्ट १९३० )

२००९: मांडे सिदिबे — माली देशाचे पंतप्रधान, मालियन अर्थशास्त्रज्ञ आणि राजकारणी (जन्म: २० जानेवारी १९४० )

२००८: अहमद फराज — उर्दू शायर (जन्म: १२ जानेवारी १९३१ )

२००६: नूर हसनअली — त्रिनिदाद आणि टोबॅगो देशाचे २रे अध्यक्ष, त्रिनिदादियन वकील आणि राजकारणी (जन्म: १३ ऑगस्ट १९१८ )

२००१: केन टायरेल — इंग्लिश रेस कार चालक आणि व्यापारी, टायरेल रेसिंगचे संस्थापक (जन्म: ३ मे १९२४ )

२००१: डॉ. व. दि. कुलकर्णी — संतसाहित्याचे अभ्यासक समीक्षक




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२५ ऑगस्ट**

# २०१२ : व्हॉयेजर १ — आंतरतारकीय अवकाशात पोहोचणारी पहिली मानवनिर्मित वस्तू

मानवाने आकाशाकडे पाहत विश्वाबद्दल अनेक प्रश्न विचारले आणि त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी अंतराळ संशोधनाला सुरुवात केली. या संशोधनाच्या इतिहासात व्हॉयेजर १ या अंतराळयानाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. ५ सप्टेंबर १९७७ रोजी अमेरिकेची अंतराळ संस्था नासाने व्हॉयेजर १चे प्रक्षेपण केले. सुरुवातीला गुरू आणि शनी या ग्रहांचा जवळून अभ्यास करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. मात्र पुढे या यानाने सौरमालेच्या पलीकडे जाऊन मानवी इतिहासातील एक अभूतपूर्व विक्रम नोंदवला.व्हॉयेजर १ने गुरू ग्रहाजवळून प्रवास करताना त्याच्या वातावरणाचे आणि चंद्रांचे महत्त्वपूर्ण निरीक्षण केले. गुरूवरील प्रचंड वादळे, त्यातील ग्रेट रेड स्पॉट, तसेच गुरूच्या काही चंद्रांवरील भौगोलिक वैशिष्ट्यांबाबत महत्त्वाची माहिती या मोहिमेतून मिळाली. त्यानंतर यानाने शनीकडे प्रवास केला. शनीच्या कड्यांची रचना आणि त्याचा सर्वात मोठा चंद्र टायटन याच्या वातावरणाचा अभ्यास करण्यात व्हॉयेजर १ची महत्त्वाची भूमिका होती.गुरू आणि शनीचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर व्हॉयेजर १ने आपला प्रवास सौरमालेच्या बाहेरील दिशेने सुरू ठेवला. हे अंतराळयान सूर्यापासून सतत दूर जात राहिले. त्याच्या उपकरणांच्या माध्यमातून सौर वारा, विद्युतभारित कण आणि चुंबकीय क्षेत्र यांचा अभ्यास करण्यात आला. जसजसे यान सूर्यापासून दूर गेले, तसतसे त्याला सौरमालेच्या बाहेरील भागातील वेगळी परिस्थिती अनुभवायला मिळाली.२५ ऑगस्ट २०१२ हा दिवस अंतराळ संशोधनाच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला. नासाच्या वैज्ञानिकांच्या मते, त्या काळात व्हॉयेजर १ने सूर्याच्या प्रभावाखाली असलेल्या हेलिओस्फिअरच्या बाहेरील सीमा ओलांडून आंतरतारकीय अवकाशात प्रवेश केला. त्यामुळे आंतरतारकीय अवकाशात पोहोचणारे हे पहिले मानवनिर्मित अंतराळयान ठरले.आंतरतारकीय अवकाश म्हणजे ताऱ्यांच्या मधील विशाल प्रदेश. या प्रदेशात सूर्यापासून येणाऱ्या सौर वाऱ्याचा प्रभाव कमी होतो आणि वेगळ्या प्रकारचे कण व चुंबकीय वातावरण आढळते. व्हॉयेजर १वरील वैज्ञानिक उपकरणांनी या प्रदेशाची माहिती पृथ्वीवर पाठवून वैज्ञानिकांना सौरमालेच्या बाहेरील वातावरण समजून घेण्यास मदत केली.या मोहिमेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यानासोबत पाठवण्यात आलेली गोल्डन रेकॉर्ड. या सोनसळी ध्वनिमुद्रिकेत पृथ्वीवरील विविध ध्वनी, संगीत, चित्रे आणि मानवी जीवनाची ओळख करून देणारी माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. भविष्यात कधीतरी हे यान इतर कोणत्याही बुद्धिमान जीवाला सापडल्यास पृथ्वी आणि मानवजातीची माहिती मिळावी, अशी कल्पना त्यामागे आहे.व्हॉयेजर १चे आयुष्य मूळ अपेक्षेपेक्षा कितीतरी मोठे ठरले. जवळपास पाच दशकांच्या या प्रवासाने मानवाच्या वैज्ञानिक क्षमतेची सीमा किती दूरपर्यंत जाऊ शकते, हे दाखवून दिले.

# काजोल आयकट - लेखनातून तरुण मनाचा वेध घेणारे

**जन्मदिन विशेष**

काजोल आयकट हे भारतीय लेखक आणि कादंबरीकार म्हणून ओळखले जातात. अत्यंत कमी वयात साहित्याच्या क्षेत्रात प्रवेश करून त्यांनी तरुणांच्या भावना, नातेसंबंध, प्रेम, सामाजिक दबाव, संघर्ष आणि मानसिक स्थिती यांसारख्या विषयांना आपल्या लेखनातून मांडले. त्यांच्या लेखनाची शैली तरुण वाचकांना जवळची वाटणारी आणि समकालीन जीवनाशी जोडलेली आहे. त्यामुळे नव्या पिढीतील लेखक म्हणून त्यांच्या साहित्यिक प्रवासाकडे विशेष लक्ष वेधले गेले.काजोल आयकट यांचा जन्म २५ ऑगस्ट १९९४ रोजी झारखंडमधील हजारीबाग येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना वाचन, लेखन आणि चित्रकलेची आवड होती. शालेय जीवनातच त्यांनी कविता आणि लघुकथा लिहिण्यास सुरुवात केली. पुस्तकांमधून विविध जगांचा परिचय करून घेण्याची त्यांची सवय पुढे त्यांच्या लेखनासाठी महत्त्वाची ठरली. शिक्षण घेत असतानाही साहित्याची आवड त्यांनी जपली.त्यांनी हजारीबाग येथील डीएव्ही पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी बिरला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मेसरा येथे व्यवसाय व्यवस्थापनाचे शिक्षण घेतले. एकीकडे व्यवस्थापनाचे शिक्षण सुरू असताना दुसरीकडे त्यांचे मन लेखनाकडे आकर्षित होत होते. या दोन वेगवेगळ्या क्षेत्रांचा समतोल साधत त्यांनी आपला साहित्यिक प्रवास पुढे नेला.काजोल आयकट यांच्या साहित्यिक कारकिर्दीतील सर्वांत उल्लेखनीय टप्पा म्हणजे त्यांची पहिली कादंबरी 'Unsocial Amigos'. ही कादंबरी २०१४ मध्ये प्रकाशित झाली. विशेष म्हणजे त्यावेळी आयकट यांचे वय अवघे १९ वर्षे होते. एवढ्या कमी वयात कादंबरी प्रकाशित झाल्यामुळे त्यांच्याकडे नव्या पिढीतील प्रतिभावान लेखक म्हणून पाहिले गेले.'Unsocial Amigos' या कादंबरीत तरुणांच्या आयुष्यातील नातेसंबंध, प्रेम, सामाजिक अपेक्षा आणि समाजाच्या पूर्वग्रहांचा वेध घेण्यात आला आहे. तरुणांना आपल्या नात्यांबाबत कोणत्या प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो, समाज त्यांच्या निर्णयांकडे कसा पाहतो आणि वैयक्तिक स्वातंत्र्य व सामाजिक चौकट यांच्यातील संघर्ष कसा निर्माण होतो, याचे चित्रण या लेखनातून दिसते.यानंतर काजोल आयकट यांनी 'The Unbreakable You' या कथासंग्रहातही योगदान दिले. त्यातील 'Life Isn't a Fairytale' ही कथा विशेष उल्लेखनीय आहे. जीवनात अडचणी, आजारपण किंवा इतरांकडून होणारा त्रास यांचा सामना करणाऱ्या व्यक्तीच्या भावविश्वाचा या कथेतून वेध घेतला जातो. संकटांपुढे हार न मानता स्वतःमध्ये असलेली ताकद ओळखण्याचा संदेश या कथेतून मिळतो.२०१५ मध्ये त्यांची 'Reason to Live' ही कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीत निराशा, प्रेम, नातेसंबंध आणि जगण्यामागील प्रेरणा यांसारख्या विषयांचा विचार करण्यात आला आहे. जीवनात कठीण प्रसंग आले तरी त्यातून बाहेर पडण्यासाठी एखादी आशेची किरण कशी महत्त्वाची ठरू शकते, याचा शोध या कादंबरीत घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनात केवळ प्रेमकथा किंवा मनोरंजन नसून मानवी भावनांचा शोध घेण्याचा प्रयत्नही दिसतो.काजोल आयकट यांच्या लेखनावर विविध आंतरराष्ट्रीय आणि भारतीय लेखकांचा प्रभाव आहे. डॅन ब्राउन, खुशवंत सिंग, अरुंधती रॉय आणि जे. के. रोलिंग यांसारख्या लेखकांचे साहित्य त्यांनी वाचले आहे. विविध प्रकारचे साहित्य वाचल्यामुळे त्यांच्या लेखनशैलीवरही त्याचा परिणाम झाला. त्यांच्या मते, चांगला लेखक होण्यासाठी सातत्याने वाचन करणे आणि सतत लिहिण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.लेखनासोबतच काजोल आयकट यांनी डिजिटल माध्यमांमध्येही आपली उपस्थिती निर्माण केली आहे. पुस्तकांशी संबंधित माहिती, साहित्य आणि वाचनसंस्कृती नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या कामात ते सक्रिय राहिले आहेत. त्यांचे 'Days with My Red-Flag Girlfriend' हे पुस्तकही प्रकाशित झाले आहे.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
• कमी वेदना, जलद बरे होणे
• लेझर व प्रगत तंत्रज्ञान
• अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
• गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या
श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर

# लेखी आश्वासनानंतर राष्ट्रवादीचे उपोषण मागे

## मुजोर अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई होणार



युवावार्ता (प्रतिनिधी)

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील खेड-सिन्नर विभागातील अपूर्ण कामे, व्हाईट टॉपिंग आणि रस्ता सुरक्षेच्या गंभीर मुद्द्यांवरून सुरू असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे आमरण उपोषण अखेर नवव्या दिवशी मागे घेण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरनाने आंदोलकांच्या मागण्यांची दखल घेत कालबद्ध कारवाईचे लेखी पत्र दिल्यानंतर हे उपोषण स्थगित करण्यात आले.

महामार्गावरील सातत्याने होणारे अपघात आणि सुरक्षेच्या अभावामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रवीण कानवडे व विद्यार्थी युवकचे तालुकाध्यक्ष गजानन भोसले यांनी संगमनेर येथे हे आंदोलन छेडले होते. या आंदोलनाची दखल राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घेतली. पक्षाचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांनी उपमुख्यमंत्री पवार यांची भेट घेऊन आंदोलनाची सविस्तर माहिती दिल्यानंतर राज्य सरकार आणि एनएचएआय प्रशासनाने तातडीने सूत्रे हलवली.

यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरनाने कडून देण्यात आलेल्या लेखी आश्वासनात म्हटले आहे की, पुढील सात दिवसांत खेड-सिन्नर या संपूर्ण विभागाचे सविस्तर 'रोड सेफ्टी ऑडिट' केले जाईल. यामध्ये अपघातप्रवण क्षेत्रे (ब्लॅक स्पॉट्स), जंक्शन्स, सिग्नल, रोड मार्किंग, क्रॅश बॅरिअर्स आणि पथदिव्यांची प्रत्यक्ष पाहणी होईल. सेफ्टी ऑडिटच्या अहवालात सुचवलेल्या अतिरिक्त सुरक्षा उपाययोजना प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वी प्राधान्याने राबवल्या जातील..कंत्राटदार आणि सल्लागाराच्या स्वतंत्र अभियंत्यांकडून मिळणाऱ्या असहकार्याच्या तक्रारींची गांभीर्याने नोंद घेण्यात आली आहे. महामार्गाच्या कामात निष्काळजीपणा करणाऱ्या मुजोर अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. महामार्गावरील व्हाईट टॉपिंगसह इतर सर्व प्रलंबित कामे तातडीने आणि वेगाने पूर्ण करण्याचे कडक निर्देश कंत्राटदाराला देण्यात आले आहेत.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरनाचे प्रबंधक (तांत्रिक) अंकीत यादव, सुभाष घंटे आणि अरुण कुमार चौधरी यांच्या स्वाक्षरीचे अधिकृत पत्र मिळाल्यानंतर उपोषणकर्त्यांनी आंदोलन मागे घेतले. महामार्गावरून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांची आणि स्थानिकांची सुरक्षितता पूर्णपणे सुनिश्चित होईपर्यंत या सर्व कामांवर आमचे बारकाईने लक्ष असेल, असा इशारा प्रवीण कानवडे यांनी प्रशासनाला दिला आहे. यावेळी महिला जिल्हाध्यक्ष वैशालीताई राऊत, संतोष भुजबळ, अमोल म्हस्के, छावा ब्रिगेडचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश तोरमल, प्रवीण कासार, सचिन रेवगडे, ज्ञानेश्वर माळी, रईस पठाण, सरपंच सेवा संघाचे अध्यक्ष बाबासाहेब पावसे,रवी पावसे, यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# पालिका कर्मचाऱ्यांची मनमानी

## नगरसेवक योगेश जाजूंनी मिळवून दिले जन्म-मृत्यू दाखले



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपालिकेत जन्म-मृत्यू दाखले काढण्यासाठी आलेल्या नागरिकांना 'सॉफ्टवेअर बंद आहे', 'सर्व्हर डाऊन आहे' अशी कारणे देत गेल्या काही दिवसांपासून हेलपाटे मारायला लावल्याचा प्रकार समोर आला. याची माहिती मिळताच नगरसेवक योगेश जाजू यांनी थेट पालिकेतील संबंधित कर्मचाऱ्यांच्या टेबलवर जाऊन पाहणी केली. सिस्टीम सुरू असतानाही केवळ ओटीपीची अडचण असल्याचे स्पष्ट होताच त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तातडीने प्रश्न मार्गी लावला आणि नागरिकांना काही मिनिटांतच दाखले मिळवून दिले. या तत्परतेबद्दल नागरिकांनी जाजू यांचे कौतुक केले.

नगरपालिकेत विविध कामांसाठी दररोज मोठ्या संख्येने नागरिक येतात. मात्र, संबंधित विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून कामे वेळेत न करता विविध कारणे सांगून नागरिकांची टाळाटाळ केली जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. जन्म-मृत्यू दाखला मिळविण्यासाठीही नागरिकांना वारंवार पालिकेत फेऱ्या माराव्या लागत असल्याचे चित्र होते.

शहरातील विकासकामे आणि नागरिकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी नगरपालिकेत गेले असता, कर्मचाऱ्यांच्या टेबलभोवती नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली. नागरिकांशी संवाद साधल्यानंतर ते अनेक दिवसांपासून दाखल्यासाठी येत असल्याचे आणि प्रत्येक वेळी 'सॉफ्टवेअर बंद आहे', 'सर्व्हर डाऊन आहे' असे सांगून त्यांना परत पाठविले जात असल्याचे जाजू यांच्या निदर्शनास आले.

### 'सर्व्हर डाऊन'च्या नावाखाली टाळाटाळ

यानंतर त्यांनी थेट संबंधित कर्मचाऱ्यांकडे जाऊन वस्तुस्थितीची पाहणी केली. त्यावेळी सॉफ्टवेअर सुरू असल्याचे दिसून आले. केवळ ओटीपी प्राप्त होत नसल्याने तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. मात्र, नागरिकांना 'सर्व्हर डाऊन आहे' असे सांगितले जात असल्याचे जाजू यांनी निदर्शनास आणून दिले. त्यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून ओटीपीची अडचण दूर केली आणि काही मिनिटांतच दाखले देण्याची प्रक्रिया सुरू करून घेतली.

'नगरसेवक म्हणून केवळ खुर्चीत बसणे नव्हे, तर नागरिकांच्या अडचणीच्या वेळी त्यांच्या पाठीशी उभे राहणे ही माझी जबाबदारी आहे,' अशी भूमिका योगेश जाजू यांनी व्यक्त केली. दरम्यान, नगराध्यक्षा रात्रंदिवस शहराच्या विकासासाठी प्रयत्न करीत असताना काही निष्काळजी कर्मचाऱ्यांच्या कारभारामुळे नगरपालिकेची प्रतिमा मलीन होत असल्याबद्दल जाजू यांनी नाराजी व्यक्त केली. नागरिकांची कामे विनाकारण प्रलंबित ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष ठेवून नागरिकांना वेळेत सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
• मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
• पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
• हेल्थ इंडिया इन्शुरन्स
• FHPL हेल्थ इन्शुरन्स
• इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
• बजाज आलियांज इन्शुरन्स
• एसबीआय जनरल इन्शुरन्स
• ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
• मेडसेव टीपीए प्रा.लि.
• जेनिन्स इंडिया टीपीए लि.
• ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
• टाटा एआयजी इन्शुरन्स
• रिलायन्स जनरल इन्शुरन्स
• मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
• चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
• नॅशनल इन्शुरन्स कं.
• न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
• निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
• युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
• स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
• दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
• एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
• युनायटेड हेल्थकेअर लि.
• Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
• मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
• एम.डी.इंडिया हेल्थकेअर
• विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
• पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड | रत्नागिरी | सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# माळीवाडा ते म्हाळुंगी पूल रस्ता दुरुस्तीची गरज - भाऊ जाखडी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर शहरातील माळीवाडा ते म्हाळुंगी नदीवरचा पूल या दरम्यानचा रस्ता अनेक महिन्यांपासून प्रचंड खराब झाला आहे. त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी संगमनेर पुरोहित प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊ जाखडी यांनी केली आहे. तातडीने दुरुस्त न झाल्यास सनदशीर मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

हा रस्ता खूपच खराब झालेला. शेकडो खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे वाहन चालवणे पायी चालणे देखील अशक्य झाले आहे. अनेक जण त्यामध्ये धडपडले आहेत, अनेक जण जायबंदी झालेले आहेत. वाहनांचे देखील प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या परिसरात हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहे. मालपाणी विद्यालय देखील या परिसरात आहे. त्या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची ने आणण्यासाठी सतत वाहने येत जात असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्याही जीवाला धोका निर्माण झालेला आहे. येथून जवळच मालपाणी उद्योग समूहाचे दोन कारखाने आहेत. त्या कारखान्यांमध्ये हजारोंच्या संख्येने कामगार ये-जा करतात. त्यांनाही दिवसेंदिवस या रस्त्यावरून कारखान्याकडे जाणे म्हणजे तारेवरची कसरत करावी लागत आहे. या परिसरामध्ये काही मोठी व्यापारी संकुले काही शासकीय कार्यालय आहे. पेट्रोल पंप इत्यादी आस्थापने आहेत. त्या सर्वांच्या दृष्टीने खड्डेमय कोल्हार घोटी महामार्ग म्हणजे डोकेदुखी होऊन बसला आहे. त्यामुळे यावर तातडीने तोडगा काढून लोकांच्या डोक्यात धूळफेक करणारी मलमपट्टी न करता दर्जेदार पद्धतीने खड्डे बुजवावेत असे जाखडी यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे. दुरुस्ती न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी पत्रकात शेवटी दिला आहे.

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
※ कर्ज रक्कम वाढ | ※ कर्ज व्याजदर कमी | ※ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

मार्स युनिव्हर्स प्रायव्हेट लिमिटेड
टूर्स, ट्रॅव्हल्स आणि कॉर्पोरेट सर्व्हिसेस
तुमचे पाऊल मंगळावर ठेवण्यासाठी मार्स युनिव्हर्स सज्ज
प्रति व्यक्ती 59,000/-* (फुकेत, बँकॉक)
प्रति व्यक्ती 79,000/-* (व्हिएतनाम, सिंगापूर, बाली)
आंतरराष्ट्रीय टूर पॅकेजेस | कॉर्पोरेट इव्हेंट मॅनेजमेंट | मिटींग्स, इन्सेंटिव्ह टूर्स | विश्वसनीय सेवा उत्तम नियोजन
1 ला ग्रुप - 26 सप्टेंबर
2 रा ग्रुप - 1 ऑक्टोबर
3 रा ग्रुप - 10 ऑक्टोबर
संपर्क - किशोर सोनवणे 9309429705

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय रोग परिमार्जनाय
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25